# प्रकरण दुसरे
# ' शीळ ' मधील कवितांचे स्वरुप

## ०१. प्रास्ताविक :

ना. घ देशपांडे यांचा ' शीळ ' हा पहिला काव्यसंग्रह मौज प्रकाशनने १० मे १९५४ मध्ये प्रकाशित केला. या काव्यसंग्रहाने सर्व महाराष्ट्रीय रसिक वाचकाला वेड लावले. यातील काही कविता काव्यसंग्रह प्रकाशित होण्यापूर्वीच ध्वनिमुद्रीत झाल्यामुळे कवीला अल्पावधीत लोकप्रियता लाभली. ' शीळ ' काव्यसंग्रहात येणाऱ्या कविता रानावनात फुलणाऱ्या आहेत. निसर्गातील झरे , वेली , तळे , वारा , परागकण , पीके , चांदणे , दवबिंदू , चंद्र या प्रतिमाचा वापर करुन कवी प्रेमभाव व्यक्त करतो. कवीची कविता निसर्गाशी समरस झालेली दिसते. कवी ईश्वराला सगुण तसेच निर्गुण मानतो त्यातून ईश्वर विषयक कविता जन्माला येते. खेड्यातील जीवन चित्रण कवी उत्कृष्टपणे करताना दिसतो. याच बरोबर इतरही गुढगुंजनात्मक, सामाजिक , कौटुंबिक कविता या काव्यसंग्रहात आलेल्या आहेत.

''शीळ'' या काव्यसंग्रहात एकुण ८२ कवीता आहेत. बहुतांश कविता ह्या गेय आहेत. गजानन वाटवे , जी.एन . जोशी यासारख्या मंडळींनी त्या ध्वनिमुद्रीत केल्या आहेत. कवितेला ताल , ठेका , नाद , असल्यामुळे वाचकाला त्या चालीवर म्हणता येईल. त्यामुळे 'शीळ ' या काव्यसंग्रहाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे ' शीळ ' या काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना त्यातील आशय व अभिव्यक्तीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते. त्यासाठी काव्यसंग्रहात येणाऱ्या कवितांचे प्रेमकविता, निसर्गकविता, सामाजिक कविता, कौटुंबिक कविता, गूढगुंजनात्मक कविता, जानपद गीते, गझल, आध्यात्मिक कविता इत्यादी प्रकारे वर्गीकरण करून अभ्यास करणे योग्य ठरेल.

## ०२. प्रेमकविता :

ना. घ . देशपांडे यांच्या , ' शीळ ' या काव्यसंग्रहात बहुतांश प्रेम कविता आहेत. प्रेम हा त्यांच्या काव्याचा मुख्य विषय आहे. याबाबत मं. वि. राज्याध्यक्ष ' शीळ ' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात.

''शीळ' ते ' गुंफण ' हे ना. घं. चे काव्यसंग्रह पाहिले म्हणजे, ''त्यातील प्रेम हीच निष्ठा आहे हे काव्य शृंगारापुरते नुसते प्रेमाचे प्रेम नाही.'' [१] याची साक्ष पटते. यावरुन कवीचा प्रेमावरील दृढविश्वास , निष्ठा व्यक्त होते. विशुध्द प्रेम त्यांच्या कवितेत आल्याचे स्पष्ट होते. 'शीळ ' काव्यसंग्रहात उत्कृष्ट प्रेमभावना , विरह भाव, निर्व्याज प्रेम , सांकेतिक प्रेम , प्रेमातील आशा - निराशा , प्रेम हेच सर्वस्व , सफल प्रिती , विफल प्रीती , संयमित प्रेम आल्याचे दिसते. येथे या अंगाने अभ्यास करणे सोईचे ठरते.

### २.१ उत्कट प्रेमभाव :

उत्कट प्रेमभाव हा ना. घ. देशपांडे यांच्या कवीतेचा आत्मा आहे. त्यांची 'शीळ' काव्यसंग्रहातील '' तुझ्यासाठी '' ही कविता उत्कट प्रेमभाव व्यक्त करणारी आहे. प्रेयसीला आपल्या प्रियकराचा सहवास अपरिहार्य वाटतो. त्यासाठी ती कितीही अडचणींना सामोरे जाण्यास तयार होते. प्रेयसी आपल्या उत्कट प्रेम भाव व्यक्त करताना म्हणते

' तुझ्यासाठी
कितीदा
तुझ्यासाठी रे ।
............
मी दुपारी
सोसले
ऊन माथी
ऊन माथी रे !' ( तुझ्यासाठी, पृष्ठ क्र. ३५)

येथे ' तुझ्यासाठी ' कितीदा ' या शब्दातून तिच्यातील उत्कंटता, जिव्हाळा, प्रेमभाव व्यक्त होते. हीच प्रेयसी पुढच्या कडव्यात मंदिरात सांजवाती लावून प्रियकराच्या सुख - समृद्धी साठी प्रार्थना करताना दिसते व वेळ पडल्यास जगाच्या रितीभाती सोडण्यास आपण तयार असल्याचे सांगते.

**२.२ विरह भाव :**

' ये शेवटी तरी तू ' या कवितेत प्रियकराच्या विरहात व्याकुळ होणारी प्रेयसी दिसते. प्रेयसीला प्रियकराचा सहवास न मिळाल्यामुळे ती अधीर बनते व म्हणते

' हे भागलेत डोळे , नाही उसंत जीवा

वेळा अमीर झाला , बाई कुठे बघावा ।,      ( ये शेवट तरी तू , पृष्ठ क्र. ३२)

येथे प्रेयसी प्रियकराची प्रतीक्षा करुन थकलेली दिसते. ती त्याला बघण्यासाठी आतूर झालेली आहे. आपल्या कडून काही चुक झाली असेल तर त्या बाबत ती माफी मागण्यास तयार आहे. पण प्रियकराने आपल्या प्रतिक्षेचे भेटीत रुपांतर करावे अशी अपेक्षा ती बाळगते. ' आता सुटला धीर ' ! या कवितेते प्रेयसीचा विरह पाहण्याजोगा आहे.

' आता सुटला धीर ' ,

सख्या , बघ

आता सुटला धीर

कुठवर लपवू

हृदया मधला

हा रुतलेला तीर ?'      ( आता सुटला धीर, पृष्ठ क्र. ५३ )

येथे प्रेयसी आपल्या मनातील प्रेमभाव प्रियकरासमोर व्यक्त करु इच्छित आहे. आजपर्यंत प्रेमव्यक्त न केल्यामुळे तिला खूप विरह सहन करावा लागला. पण आता प्रियकराकडुन होकार मिळो व नकार मिळो याचा विचार न करता ती एकदाचा आपला विरह संपवू इच्छिते. येथे तिचा विरह पूर्णाशांला टेकलेला दिसतो.

ज्याप्रमाणे प्रेयसीला विरह सहन करावा लागतो त्याचप्रमाणे प्रियकराला देखील विरह सहन करावा लागतो. मात्र विरहाचे रुपांतर भेटीत , मिलनात व्हावे असे दोघांना देखील वाटत असते. ' किती उशीर हा !' या कवितेत प्रियकराचा विरह दिसून येतो. प्रियकर आपला विरह व्यक्त करताना प्रेयसीला म्हणतो.

'किती उशीर हा किती उशीर हा '।
हा प्रयाणकाळ ठेपलाच शेवटी :
पाचळा जाळूनी हा विझूर शेवटी
राहिला येथे असा उदास गारवा :
किती उशीर हा , किती उशीर हा ।' (किती उशीर हा !, पृष्ठ क्र. ८७ )

येथे प्रियकर आपल्या प्रेयसीला बऱ्याच वेळापासून प्रतीक्षा करीत असल्याचे दिसतो. पूर्ण पाचोळा जळून शेगोटी विझुन गेली व सगळीकडे स्तब्धता निर्माण झाली आहे. पण अजून प्रेयसी आली नाही तेव्हा प्रियकराची ही प्रतीक्षा त्याच्या विरहात रुपांतरीत होते. त्याचा हा विरह टोकाला पोहचून त्याच्या मनातील उर्मी नाहीसी होताना दिसते हे सांगताना तो म्हणतो -

'आस सारखी धरुन वाट पाहीली :
आटली आखेर , हाय उर्मी आतली।' ( किती उशीर हा ! पृष्ठ क्र. ८७)

अशा प्रकारचा विरहभाव कवीच्या काव्यात प्रियकर , प्रेयसी यांच्या माध्यमातून येतो.

## २.३ सफल प्रिती :

प्रियकर - प्रेयसी यांचे मनोमिलन झाले व ती त्याला नेहमी सोबत करायला तयार झाली की प्रीत सफल झाली असे म्हणायला हरकत नाही . ' शीळ' काव्यसंग्रहातील पहिलीच ' शीळ ' नावाची कविता सफल प्रीतीचा उत्कृष्ट उदाहरण म्हणावे लागेल. या कवितेला प्रेयसी आपल्या प्रियकराच्या प्रेमात गुंतण्याचा प्रयत्न करताना दिसते. ती आपल्या प्रियकराला फुलाची उपमा देऊन स्वत:ला फुलराणी म्हणविते. ती म्हणते -

'रानी राया जसा फुलावाणी

रानी फुल न मी फुलराणी

......................

फिरु गळ्यात घालून गळा

मग घूम ऽ व मोहन शीळा '...   ('शीळ', पृष्ठ क्र. २५)

आपण एकमेकांच्या गळ्यात गळा घालून स्वच्छंदपणे फिरु या असा भाव प्रेयसी व्यक्त करते. येथे प्रेयसीची प्रेमाला पूर्ण संमती असल्याचे दिसते. त्याबरोबर प्रियकराला पण प्रेमाची तितकीच ओढ लागलेली दिसते. प्रेमातील त्याची स्थिती सांगताना त्याची प्रेयसी म्हणते.

'येड्यावाणी फिरे रानोवना :

जसा काही ग मोहन कान्हा।.'   ('शीळ', पृष्ठ क्र. २५)

येथे प्रियकर प्रेमामुळे बेभान होऊन प्रेयसीच्या भेटीसाठी रानावनात वेड्यासारखा भटकत राहताना दिसतो. प्रेयसीला तो कृष्णा प्रमाणे भासतो. प्रियकर जसा प्रेयसीसाठी अधीर होतो, तशीच प्रेयसीही त्याच्या मिलनासाठी आतुर झालेली दिसते. त्याची भेट झाली की प्रीत सफल झाली असे म्हणता येईल. येथे प्रियकर - प्रेयसीचे प्रेम वरकरणी स्वरुपात अजिबात नाही.

## २.४ विफल प्रीत :

प्रियकर - प्रेयसी यांचे घनिष्ठ प्रेम असले तरी परिस्थितीमुळे किंवा काही कारणास्तव सफल प्रीतीचे विफल प्रीतीत रुपांतर होते. कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यातील प्रियकर प्रेम विफल झाल्याने एकांतवासाचा आसरा घेतो. प्रियकराला समाज नकोसा वाटतो व समाजाचीही त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी घृणास्पद होते. त्याचे प्रीतीने बहरलेले मन काळाच्या ओघात कोमेजून जाते. तो मुखवटयावर जरी नकली हास्य आणत असलातरी त्याच्या मनात वेदनेची कळ सारखी सलत राहते व प्रेम वास्तव नसून मृगजळ असल्याचे त्याल

उमगते. प्रेमात आलेली विफलता त्याच्या मनाला खंत लावून जाते व तो म्हणतो -

‘ दिसले मृगजळ फिरले अवखळ हरिण उगाच फसून .
ओसाडीत बसून झुरते ओसाडीत बसून .’

( ओसाडीत बसून , पृष्ठ क्र. ३२)

येथे मृगजळाचा दाखला देऊन कवी रामायणाचा संदर्भआणतो. त्याचबरोबर मृगजळ समजुन ज्याप्रमाणे हरीण फसते, त्याचप्रमाणे आपली देखील फसगत झाल्याची जाणीव प्रियकाराला होते. अशावेळेला हा प्रियकर ओसाडीत जाऊन बसतो. येथे ओसाडीत बसणे म्हणजे निर्जन निसर्ग स्थळावर जाणे होय. या कवितेतून प्रियकराच्या ठिकाणी विफल प्रेमातून उदासिनता आल्याचे दिसते. उदास मन या कवितेतून प्रकर्षाने जाणवते. प्रियकर मनोमनी रुजवलेली अपेक्षिलेली प्रीत जर पूर्ण होत नसेल तर त्याच्या मनात नैराश्य येणे स्वाभाविकच आहे. अशा स्थितीत सुंदर जग स्मशानभूमी सारखे वाटते. ‘ शीळ ’ काव्यसंग्रहातील ‘म्हणू दे हृद्या ’ या कवितेतून देखील विफल प्रीतीचे गीतच प्रियकर गातानां दिसतो. वास्तविक हृद्य हे शुध्दतेचे , पावित्र्याचे प्रतिक मात्र प्रेमात आलेल्या अपयशामुळे त्यातुन विफलतेचे गीतच बाहेर पडताना दिसते येथे कवी म्हणतो -

‘ म्हणू दे हृद्या
अद्य नीतीचे
नियम रीतीचे
विषम प्रीतीचे गीत
-------------
गहन मनिषेने
जतन केलेल्या
पण न घडलेल्या
मधुर मिलनाचे गीत :’ ( म्हणू दे हृद्या , पृ. क्र. ५४)

येथे विषम प्रीतीचे गीत , न घडलेल्या मधुर मिलनाचे गीत, व्यथित हृदयाचे विफल गीत, हृद्यरुधीराने सतत भिजणारे गीत, कढत श्वासांनी सतत सुकणारे गीत , विगत आशेचे गीत या सर्व शद्बांतून प्रियकरांच्या मनात प्रीतीमुळे निर्माण झालेली उदासिनताच समोर येताना दिसते.

ना. घ . देशपांडे यांच्या कवितेतील प्रियकर हा मनापासुन प्रेम करताना दिसतो. कधी त्याचे प्रेम सफल होते तर कधी विफलतेकडे झुकते. अशावेळी प्रियकर अस्वस्थ होतो. ' अंतराच्या गुढ गर्भात ' या कवितेतील प्रियकर एकेकाळी उत्कटपणाने जगलेल्या व आज स्मृतिरुप उरलेल्या प्रेमाचा अनुभव सांगताना तो म्हणतो.-

' अंतराच्या गुढ गर्भी एकदा जे वाटले ग ऽ ।
एकदा जे वाटले ते प्रेम आता आटले गं ! '

प्रीतीच्या सच्चेपणाची व तीव्रपणाची जाणीव या कडव्यात होताना दिसते. प्रेमात निर्माण झालेला आशावाद व लगेच दुसऱ्या ओळीत निर्माण झालेला निराशावाद येथे विशेष वाटतो. या कवितेतील प्रियकर अनेक कल्पनांचे मनोरे बांधतो. त्यात आपल्या स्वप्नांना सजवितो. परंतु त्याची ही सोनेरी स्वप्ने पूर्णत्वास जात नाही. मध्येच त्याच्या उमलत्या स्वप्नांचा विरस होतो. प्रेयसीच्या साथ न देण्यामुळे त्याच्या इच्छा आकांक्षा कोमेजून जातात. या विफल स्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो -

' दूर सोनेरी सुखाचे पाहिले आभास मी तूं :
रंगले आभाळ पूर्वी : तेच आता फाटले ग ऽ !
चांदण्या रात्रींत मागें हिंडलो एकत्र दोघे :
चंद्रिकेने थाटले जे तें नभाने दाटले ग ऽ ! ' ( आता,पृ. क्र. ५७ )

प्रियकराने प्रेम जीवनांतल्या कल्पनाविश्वात रंगून त्याने जे सुख सौंदर्य कल्पिले होते. त्या साऱ्या केवळ कल्पनाच होत्या कारण प्रत्यक्षात ते क्षण , ते सुख , जीवन कधी प्रत्यक्षात अवतरले नाही. चांदण्या रात्रीत दोघांनी मारलेला फेरफटका आता राहला नाही. तो आता

संपून गेला. तो चंद्र , त्या चांदण्या काहीच उरले नाही. त्या दोघांत असलेले सुसंवाद पण आता राहीले नाही. गंगा नदीच्या शुध्द पाण्याप्रमाणे असलेली प्रीती संशयाने बाटली असे प्रियकर सांगतो. संशयाने ' बाटल्या ' वर सर्वच काही संपलेले येथे दिसते. शेवटच्या चरणात प्रियकराला दु:खात यातना होत नाही व सुखात चेतना नाही. असे म्हणून कवी कवितेतील भावानुभावाला तीव्र पातळीवर नेतो. प्रियकराच्या नेत्रातील अश्रु गोठले यातून प्रियकराच्या मनाची झालेली विफल स्थिती दिसते.

## २.५ आशानिराशेचा खेळ :

' ती कळी आणि ती साखळी ' या चार ओळीच्या कवितेत कवी प्रेमातील आशा-निराशा उत्कटपणे व्यक्त करतो. या कवितेत प्रेयसीच्या स्मितहास्याने प्रियकराच्या मनात प्रेमाबाबतची आशा पल्लवित झाली आहे. मात्र ही त्याची आशा फार काळ टिकून राहत नाही. त्याचे निराशेत रुपांतर होते. कवी येथे आपली खंत व्यक्त करताना म्हणतो -

' फुलून हासतांच मी तुला दिली नवी कळी
खुडून एक एक तूं झुगारलीस पाकळी :
किती तरी जपून मी दुवांदुवाच जोडला
करुन घाव तूं मध्ये दुभंगलीस साखळी '

( ती कळी आणि ती साखळी , पृष्ठ क्र. ६८ )

प्रियकराला येथे प्रेयसी आपले सर्वस्व वाटत असले तरी तिला मात्र याच्या आशा - अपेक्षा, भावनांचे काही एक देणे - घेणे नसल्याचे दिसते. ती प्रियकराच्या भावनाशी खेळ करते. येथे आशा - निराशा प्रेमाचा एक घटक बनून गेल्याचे दिसते. ही प्रेमातील आशा - निराशा कधी उफाळून येईल हे सांगता येणे शक्य नसते. कवी ना. घ . देशपांडे यांच्या कवितेतील प्रियकर निराशा पदरी पडली तरी पुन्हा हिरीरीने उभा राहून प्रेम मिळविण्याचा प्रयत्न करतो. येथे प्रेमातील आशा - निराशा याबाबत कवी गोविंदाग्रज याचे मत योग्य वाटते -

" प्रेमात मनातील आशा - निराशेची रात्र कधीही संपत नसते. "[२]

वारंवार प्रेमात निराशा पदरी पडत असल्याने , आपली फसगत होत असल्याने पुन्हा प्रेमात पडायचे नाही असे प्रियकर आपल्या मनात ठसवितो. जेव्हा पुन्हा या प्रियकराची प्रेयसी याच्या जीवनात प्रवेश करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा मागे आपली झालेली फसगत आठवून हा प्रियकर तिच्या ह्या भुलावणीला नकार देऊन तिला खडा सवाल करतो. तो म्हणतो -

' तूं दिलीस वचनें जरी
ठरविलीस लटकी तरी :
जी मुळांत नव्हती खरी प्रीत ती नको पुन्हा भासवूं '

( 'पुन्हा' पृ. क्र. ७३ )

येथे प्रियकराला प्रेयसी देत असलेली वचने खोटी वाटतात व तो तिला प्रेमाबाबतची आशा मला पुन्हा लावू नकोस अशी इच्छा व्यक्त करतो. येथे प्रियकराची प्रेमाबाबत निराशा व्यक्त होते.

मनापासून केलेली खरी प्रीत मिळाली नाही तर प्रेमिकात नैराश्य व वैफल्या आल्याशिवाय राहणार नाही. अशावेळी प्रेमिकांना प्रेम ही नको आणि प्रेमी जीवनही नको असे वाटणे साहजिकच असते. ज्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीत ना. घ. देशपांडे यांची प्रेमभावना समाजात रुजली त्या काळात तर प्रेमाला पूर्णत: विरोध होता याबाबत भीमराव कुलकर्णी लिहितात ,

" त्या काळी प्रेम हा एक विलक्षण असा 'जाळपोळी ' चा विषय होता. .... प्रेम अंतकरण जाळीत होते आणि त्यात उडी घेणाऱ्यांना पोळून होरपळून काढीत असे. रुढ वैवाहिक जीवनात रमलेले जीव सोडले तर रुढ चाकोरी बाहेरच्या प्रेमाची आसक्ती बाळगणाऱ्यांचे हुंदकेच त्या काळच्या मराठी काव्यात विशेषत्वाने आढळून येतात "[३]

१९२० ते १९३६ या काळातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत कितीतरी उलाढाली होत होत्या . त्यांचे पडसाद या काळातील कवितेत काही अपवाद वगळता

क्वचितच उमटलेले दिसतात. प्रेमविषयक , निसर्गविषयक कवितेचा ओढा या काळात जास्त प्रमाणात दिसतो.

**२.६ एकांतप्रियता :**

ना. घ. देशपांडे यांच्या ' असाच ' या कवितेतील प्रियकर एकांतवासाचा आधार घेताना दिसतो. जेव्हा प्रेयसी त्याला कोणत्याही प्रकारची सोबत करत नाही. समाज त्याला घृणास्पद नजरेने बघतो, तेव्हा या प्रियकराला सहजीवनापेक्षा एकांत प्रिय वाटतो. स्वत:हून अलिप्तता स्वीकारुन स्वत:च स्वत:ला वाट दाखवितो. ही वाट एकटयाची असलीतरी आपली येथे फसगत होणार नाही, याची त्याला पूर्ण जाणीव आहे. सुखदु:खात आपला कुणीतरी पाठीराखा असावा अशी मानवी प्रवृत्ती असते. अशा काळात जर कुणाचीच सोबत मिळाली नाही तर जीव काळवटून जातो , जीवन भकास वाटायला लागते. या कवितेतील प्रियकराला जीवनात अशीच अर्थशुन्यता वाटायला लागते तेव्हा तो म्हणतो -

' तू असाच झिंगत जा
विस्मरुन पीळ
तू असाच फुंकत जा
अर्थशुन्य शीळ '.

( असाच, पृ. क्र. ७८ )

अशाप्रकारे जी ' शीळ ' साद देऊन जीवनाला अर्थ प्राप्त करुन देते तीच ' शीळ ' कवीला या काळात अर्थशुन्य वाटते. ' ओसाडीत बसून ' या कवितेत सुध्दा जीवनात उदासिनता आल्यामुळे प्रियकर एकांतवासाला जवळ करताना दिसतो. या एकांतात जशा वेदना आहेत, तशीच सुरक्षितता पण आहे. म्हणून प्रियकराला फसव्या प्रेमापेक्षा , दुषीत समाजापेक्षा एकांत प्रिय वाटतो. तरीपण आपण वाट चुकल्याची खंत त्याच्या मनाला लागलेली असतेच. ती खंत लवकर घालविणे शक्य होत नाही . ' ओसाडीत बसून' या कवितेत कवी म्हणतो -

‘ फिरतां वणवण माझें जीवन थकले वाट चूकून् :

ओसाडींत बसून झुरते ओसाडींत बसून .’ (ओसाडीत बसून, पृष्ठ क्र. ३२)

आता जीवनात पुढचा मार्ग गवसत नाही म्हणून प्रियकर एकांतवासाच्या आहारी जाताना येथे दिसतो.

## २.७ खरी प्रीत :

प्रेमिकांच्या हृद्यात असणारा एकमेकांवरील प्रेमाचा विश्वास हीच खरी प्रीत ठरते. प्रेमभावनेतील विश्वास , समानतेची भावना , विशुध्दतेची जाणीव प्रेमविषयाला अधिक बळकटी आणत असते. येथे ‘ येशील का रे ’ या कवितेत प्रेमाची ओढ खरी प्रीत दर्शविते. येथे प्रेयसी आपले प्रेम व्यक्त करताना म्हणते -

‘ तुझाच सांगते लागला ध्यास :

तुझ्याच नांवाचे चालले श्वास :’

( येशील का रे ? - पृ. क्र. ३४ )

ध्यास, श्वास यातून निर्माण झालेली प्रेयसीची समर्पणशील वृत्ती खरी प्रीत व्यक्त करताना येथे दिसते . ‘ तुझ्यासाठी ’ या कवितेतील प्रेयसी आपल्या प्रियकरासाठी जगाची रितीभाती, पध्दती सोडण्याची तयारी दाखविते. अशाच प्रकारची प्रेयसीची प्रियकराबाबतची एकनिष्ठ भावना खऱ्या प्रीतीची द्योतक वाटते. ‘ काल , आज आणि उद्या ’ या कवितेत प्रियकराचा प्रेयसीवरील विश्वास पाहण्याजोगा आहे.

‘ अनन्य प्रीतीशिवाय जगणे अशक्य झालें मला :

------------------------------------

हसते जग पण अजून आहे मला तुझा भरवसा :

तरुला फुटेल , बघ , पालवी ,

आज जरी अंधार भासतो गगनावर या असा ,

उद्या बहरेल चंद्रिका नवी ’ ( काल, आज आणि उद्या, पृ. क्र. ७७ )

येथे प्रियकराला प्रीतीविना जगणे अशक्य वाटते. त्याचा आपल्या प्रेयसीवर असलेल्या विश्वासातच खरी प्रीत दडलेली दिसते. आज जरी जीवनात अंधार वाटत असला तरी प्रीतीच्या जोरावरच तो अंधार नाहीसा होऊन उद्याचा प्रकाश निर्माण होणार आहे. अशी आशा प्रियकराला आहे. येथे खरी प्रीत लाखमोलाची असल्याचे कवी सुचवितो.

**२.८ आंतरिक प्रीतीची ओढ :**

ना. घ. देशपांडे यांची प्रेमवृत्ती बाह्यसौंदर्याचे महत्त्व अमान्य करीत नसली , तरी तिची खरी ओढ आंतरिक सौंदर्यांकडेच आहे. बाह्य सौंदर्यावर कवी जास्त काळ रममाण होत नाहीत. ' मालन ' या कवितेत कवी सांगतात -

' एकमेकांच्या नयनावरी
प्रीत मोहक , मूक , नाचरी :
एकमेकांचा हृद्यनाद
घालत आहे एकच साद .' ( मालन, पृ. क्र. ३० )

येथे प्रियकर - प्रेयसी आपली प्रीत शब्दांव्दारे व्यक्त करीत नसून त्यांच्या डोळ्यातून त्यांची प्रीत झळकतांना दिसते. त्यासाठी प्रीत शब्दांव्दारे व्यक्तच करायला हवी असे अजिबात नाही. दोघांचाही हृदयनाद एकच साद घालतो. यातून त्यांच्यामध्ये असलेली आंतरिक प्रीतीच दिसून येते

' येशील का रे ' ? याकवितेत प्रेयसीची प्रियकराविषयी असलेली उत्कट आंतरिक प्रीत व्यक्त होताना दिसते येथे प्रेयसी म्हणते -

' अवती भोवती नव्हतें दुजे :
वाळूंत चुंबिले पाऊल तुझे .
.........................

त्याचबरोबर, तुझाच सांगते लागला ध्यास :
तुझ्याच नावाचे चालले श्वास :' ( येशील का रे ?, पृ. क्र. ३३ )

प्रेयसी आपल्या प्रियकराचे पाऊल वाळूत चुंबिते. त्याचबरोबर तिचा ध्यास व श्वास केवळ प्रियकर आहे. तिला त्याच्या शिवाय अन्य गोष्टीची फिकीर नाही. प्रियकर हेच तिचे आकाश बनलेले आहे. प्रेम हेच तिचे सर्वस्व असल्याचे येथे दिसून येते. तिची प्रीत किंवा त्याची प्रीत ही बाह्य सौंदर्यावर अवलंबून नसून आंतरिक सौंदर्याला महत्त्व देणारी आहे. कवी ना. घ. देशपांडे यांची स्त्रीप्रेमाची कल्पना शारीरिक आकर्षणाच्या पलिकडे गेलेली येथे दिसते. त्याचबरोबर कवीची कविता आंतरिक प्रीतीचा सोस बाळगणारी आहे. असे आपणास दिसेल.

## ०३. निसर्ग कविता :

निसर्ग हा ना. घ. देशपांडे यांच्या काव्याचा एक अविभाज्य घटक आहे. तसे पाहिल्यास पुरातन काळापासून माणसाचे मन आणि निसर्ग यांच्यात जवळीकता साधलेली आहे. आधुनिक कवितेचे जनकत्व मिळालेल्या केशवसुतापासून तर आजतागायत असलेल्या कवीपर्यंत अनेक कवींचा ' निसर्ग ' हा काव्याचा विषय बनला आहे. कवी निसर्गाच्या माध्यमातून आपल्या मनातील राग, लोभ सौंदर्य , प्रीती व्यक्त करतो. तर कधी त्याच्याच माध्यमातून जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडतो. असा हा निसर्ग मानवाला त्याच्या जन्मापासून मोहित करत आलेला दिसून येतो. निसर्ग मनुष्याला जगण्याची प्रेरणा देतो. संकटात खंबीर व स्थिर राहण्याचा संदेश देतो. बदलणारे ऋतु जीवनात नवपरिवर्तन आणण्यास सांगतात. निसर्गातील पक्षी , प्राणी मनुष्याला कलाकुसर शिकवितात. फुले आपल्या सुवासाने मनुष्य जीवनात सुगंध भरतात. म्हणून निसर्ग आणि मानव यांचा संबंध परस्परोपकारकच आहे. असे स्पष्ट होते. निसर्गाशिवाय मानवी जीवन संवेदनाहिन बनून राहिल, हेही तेवढेच सत्य होय. ' शीळ ' काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना कवी ना.घ. देशपांडे यांनी रेखाटलेला निसर्ग पाहणे येथे सोईचे ठरते.

कवी ना. घ. देशपांडे हे बुलढाणा जिल्हयातील ता. मेहकरचे राहणारे होत. तेथील निसर्ग हा सुंदर आणि मोहक वाटतो. दाट वनझाडी , सर्वत्र हिरवळ , डोंगराळ भाग मनाला मोहवून घेतो. त्यामुळे कवी ना. घ. देशपांडे यांच्या मनावर त्याचा प्रभाव असणे साहजिकच आहे. ' शीळ ' काव्यसंग्रहात येणाऱ्या बहुतांश निसर्ग कविता प्रेम भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. प्रेम व्यक्त करताना निसर्गातील घटकांचा कवी वापर करतो. असे दिसते. त्याचबरोबर निसर्ग येथे प्रेमिकांच्या सुखदु:खाशी समरस झालेला दिसतो. काव्यसंग्रहात ग्रामीण भागातील निसर्ग चित्रित झाला असला तरी यातील कविता शेती, शेतकरी , नांगरणी , पेरणी , शेतकऱ्याची हालाखीची स्थिती याचे चित्रण करीत नाही. केवळ काही एक - दोन कविता वगळल्यास ना. घ. देशपांडे यांची कविता अधिक कृषिजीवनाचा परामर्श घेताना दिसत नाही.

### ३.१ प्रेम व निसर्ग यांचा मिलाफ असणाऱ्या कविता :

ना.घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' या काव्यसंग्रहातील कवितेत प्रेम आणि निसर्ग हातात हात घालून चाललेले दिसतात. कवी आपली प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी निसर्गालाच वेठीस धरतात. कवीने तरू , जाईची फुले, नभ , चंचला , झरा , धन , पक्ष्यांची किलबिल , चांदण्या , दुर्वांकुर , पालवी , दरी , वारा , नदी इत्यादी घटकाच्या साहाय्याने आपली प्रेमभावना व्यक्त केली आहे. कवी निसर्गाचे वर्णन करताना निसर्गाच्या अंतरंगापेक्षा बाह्य सौंदर्यावर अधिक भर देतात. प्रियकर - प्रेयसी यांच्यातील मन , भावना व्यक्त करण्यासाठी निसर्गाचा आधार घेतात. कवीची कविता समाजापेक्षा रानावनात जास्त रमते. त्याचे कारण समाज त्यांना दु:खपूर्ण , स्वार्थी व नैराश्याने भरलेला दिसत असावा याउलट निसर्ग त्यांना आपले विश्रांती स्थान वाटते. स्वत:मधील प्रीत चैतन्य कवीला निसर्गात प्रतिबिंबीत होताना दिसते. याचेच रुपांतर त्यांच्या प्रेम व निसर्ग यांचा मिलाफ असणाऱ्या कवितेत होते.

कवी ना. घ. देशपांडे आपल्या निसर्ग कवितेतून विरही मनाचे भाव , मुक्त मनाचा आनंद सूक्ष्मपणे टिपतात. प्रियकर प्रेयसीची भेट , त्यांचा सहवास , त्यांच्यातील दुरावा कवी कवितेतून उत्कटपणे मांडतात. निसर्गातील प्रतिमांचा वापर करुन कवितेत प्रेमभावनेचे मनसोक्त वर्णन केलेले आहे. ते वर्णन चित्रमय वाटते. ' शीळ ' हया काव्यसंग्रहात प्रामुख्याने ' शीळ', 'तुझ्या माझ्यात ग ऽ' , ' तळमळ ' ' मालन ' 'इशारा ' ' या रामपहारी', ' रानराणी ' ' रंकाची राणी ' ' आज जाऊ दूर रानी ' ' पावसाळा ' ( प्रेम व निसर्ग तूलना ) ' सांज हसली ' ' साद नाही तुम्हाला ' ' उत्कंठा ' या निसर्ग कवितांचा समावेश असल्याचे सांगता येईल.

ना. घ. देशपांडे यांच्या पहिल्याच व गाजलेल्या ' शीळ ' या कवितेत प्रेम व निसर्ग यांचा सुंदर मिलाफ दिसतो. यातील प्रियकर - प्रेयसीचे प्रेम रानावनात फुलताना दिसते. ज्याप्रमाणे एखादे बीज उमलण्यासाठी पोषक वातावरणाची गरज असते. अगदी त्याचप्रमाणे ना. घ. देशपांडे यांचे प्रेमानुकुलकाव्य फुलण्यासाठी निसर्ग त्याच्या काव्यप्रतिभेला जवळ घेतांना दिसतो. हा कवी समाजापासून अलिप्त जाऊन शांतमय ठिकाणी आपली कविता फुलवितो. ' शीळ 'या कवितेत आलेली प्रेयसी आपले प्रियकरावरील प्रेम व्यक्त करताना दिसते. त्याला ती मोहन कान्हा , राम संबोधते . प्रियकराला निळ्या घनाची उपमा देते. आपल्या प्रियकराला ' फुल ' तर स्वत:ला ' फुलराणी ' म्हणून घेते व प्रियकराला रानात शीळ ( हाक) देते -

' रानारानांत गेलि बाइ शीळ ।
रानारानांत गेलि बाइ शीळ ।

.............

वाहे झरा ग झुळझुळ वाणी :
तिथं वाऱ्याचिं गोड गोड गाणी :
तिथं राया तुं उभा असशील !' ( शीळ पृ. क्र २५)

येथे ' रान ' व प्रियकराला दिलेली ' शीळ ' त्याचबरोबर झरा , वारा व प्रेमाची गोड गाणी , ' रान ' व ' रायाचे तेथे येणे ' एकत्रितपणे येते. प्रेम व निसर्ग याच्यात येथे सहसंबंध आलेला दिसतो. कवी निसर्गातील घटकाचा वापर करुन प्रियकर - प्रेयसीचे प्रेमभाव व्यक्त करताना येथे दिसतो.

' तुझ्यामाझ्यांत ग !' या कवितेत प्रियकर व प्रेयसी यांच्या प्रेमातील एकरुपता दर्शविली आहे. कवी प्रेम व्यक्त करण्यासाठी निशिगंधाच्या फुलाची प्रतिमा वापरताना दिसतो. कवी म्हणतो -

' आज आहे , सखे
निशिगंधात गंध
श्वसनाचा प्रबंध
तुझ्यामाझ्यांत ग । '

( तुझ्या माझ्यात ग ! पृ. क्र. २७ )

तसेच ' कंचनी' या कवितेत 'हासरी फुले', 'नाचले हे वन ' , 'प्राजक्ताच्या तळी ', 'लाजली ही कळी ' ' फुलांची गुंफण ' अशाप्रकारे मानवी भावभावनाचें निसर्गावर आरोपण केलेले दिसते.

कवीची ' मालन ' ही कविता निसर्ग व प्रेम यांचा उत्कृष्ट संगम असलेली ठरते. या कवितेत शब्दाशब्दांतून निसर्ग बहरलेला दिसतो. पान - रान , घरी - दारी , बिंदू - इंदू , डोळे - भोळे , अशी - जशी अशाप्रकारे उत्कृष्टरित्या यमक साधून कवितेत लयबध्दता निर्माण झाली आहे. या कवितेत सुरवातीपासून शेवटपर्यत प्रेम व निसर्ग यांच्यात एकरुपता साधण्यात कवी यशस्वी झाला आहे. कवितेतील मानवी भावभावना व निसर्ग यांची योग्यरीत्या गुंफण झाल्याचे येथे दिसते.

' इवला झरा गायन गात
चांदण्यासवे हासली रात :

हालेना जरा वेलीचे पान :

निजली धरा निजले रान :

आई , बहिणी झोपल्या घरी

ये ग ये ग ये मागल्या दारी ।

माथ्यावरती आला चंदीर

सांग , मी कसा धरावा धीर ?

भागले डोळे वाट पाहून :

प्रीतीची माझी ये ग मालन । ' ( मालन , पृ. क्र. २९ )

रात्रीच्या वेळेला प्रियकर - प्रेयसी यांचा भेटण्याचा प्रसंग कवीने येथे रेखाटला आहे. ही कविता वाचतांना प्रसंग हुबेहुब डोळ्यासमोर निर्माण होत असल्यामुळे कविता चित्रमय वाटते. अशा प्रकारचे मत व्यक्त करताना प्रभा गणोरकर म्हणतात. ''ना. घं. च्या प्रत्येक कवितेत निसर्गाचे कोणते ना कोणते रुप चित्रबध्द होऊन ओळीत उभे असते. भाववृत्ती प्रमाणे निसर्गाची रुपेही बदलत असतात.'' [४] वरील प्रभा गणोरकर यांचे मत वरील कवितेला लागू पडणारे आहे असे दिसते.

' या रामपहारी ' या कवितेत प्रेयसीची प्रत्येक कृती व निसर्गातील घटकांची होत असलेली हालचाल यांत साम्य दाखविले आहे. प्रेयसीची प्रियकराला भेटण्याची ओढ विशेष वाटते. कवीने या प्रसंगातील गतिमानता सुंदररित्या शब्दबध्द केली आहे.

' हे माघामधलं ऽ हीवं : थरकते अंग :

हुरहुर वाटते : कुणीच नाही संग ऽ

...........................

अन् नकोस हासू , चंद्रा माझ्या मांग ।

भयभयीत अशी मी : कुणीच नाही जाग ऽ '

( या रामपहारी, पृ. क्र. ४३ )

वरील काव्यपंक्तीतील चंद्र हा हसत हसत प्रेयसीचा पाठलाग करताना दिसतो असे वर्णन आलेले आहे. येथे चंद्र हा जणू कुणीतरी माणूस आहे असे वाटते. चंद्राला मानवी रुप देण्यात कवी पूर्णत: यशस्वी झाल्याचे लक्षात येते. कवीची कल्पकता येथे दिसून आल्यावाचून राहत नाही . येथे निसर्ग व प्रेम यांच्यात कवीने योग्य संबंध साधल्याचे दिसते.

ना. घ. देशपांडे यांनी ' रंकाची राणी ' ही कविता आपल्या पत्नीला उद्देशून लिहिली आहे. या कवितेतील पती हा पत्नी विश्वासात घेऊन तिला आपल्या अडचणी सांगतो , तिला आपल्या गरिबीची जाणीव करुन देताना तो दिसतो.

' दुर्वांचे गालिच्चे विश्रांतीसाठी
भोवताली रानीची चंदेरी शांती : ' ( रंकाची राणी, पृ. क्र. ५६ )

आपण आपल्या पत्नीला भौतिक सुख समृद्धी देवू शकलो नाही. पण निसर्गातील रम्य शांती तिच्या पदरी पाडू शकलो त्याचा त्याला आनंद आहे. ' दुर्वांचे गालिचे' चंदेरी शांती' या प्रतिमा सुंदर वाटतात. येथे निसर्ग व प्रेम एकमेकात गुंफल्या सारखे भासते.

' आज जाऊ दूर रानी ' या कवितेत कवी समाजाला मान्य असलेला व्यवहारी कायदा मोडून निसर्गात आपला एक प्रेमाचा कायदा बनवू इच्छितो . त्या कायद्यात मान, विद्या , वित्त याला स्थान राहणार नाही. ' प्रेम दे अन् प्रेम घे ' हा एकच नियम तेथे राहिल. हा सौदा स्वार्थी जग वेड्याचा सौदा म्हणेल पण या स्वार्थी , जगाची काहीही फिकिर करुन नकोस . असे प्रियकर प्रेयसीला सांगतो. निसर्गाने जे आपणाला भरभरुन दिले आहे ते आपण इतरांना ही भरभरुन देऊ . अशी इच्छा कवी व्यक्त करतो. निसर्ग हा दाता आहे. तो आपणाला प्रेम , शांती , सौंदर्य भरभरुन देतो आपण ही या प्रेमाचा विस्तार करु या , असे कवी येथे सुचवितो. अशाच निर्लेप प्रेमाबाबत श्री. के. क्षीरसागर यांचे उत्तर पाहण्यासाखे आहे.

" जगात सर्वात सुंदर वस्तु कोणती ? अशा प्रश्नाला श्री. के. क्षीरसागर यांनी दिलेले उत्तर " सर्वात सुंदर वस्तु प्रेम ही होय। " [५] असे त्यांनी उत्तर दिले . दिलेले उत्तर येथे

विशेष वाटते. याच प्रेमाचा महिमा कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात विशेषत्वाने शब्दबध्द झालेला दिसतो.

'पावसाळा' या कवितेतून कवी ना. घ. देशपांडे यांनी निसर्ग आणि मानवी वृत्ती यात साम्य साधले आहे. निसर्गातील 'पावसाळा' ऋतू आणि प्रेयसीच्या नाजूक हालचाली यांच्यात सुंदर साम्य साधले आहे. निसर्गाचे वर्णन ज्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने समोर येते. त्याचप्रमाणे प्रेयसीचे वर्णन आपल्या समोर येते. 'रान' ज्याप्रमाणे पावसाने चिंब होते त्याचप्रमाणे सखीची 'लोचने' देखील प्रियकराच्या विरहाने चिंब झाली आहेत असे दिसते

'चिंब झाली पावसाने भोवती रानावने :
वर्षती येथे सखीची पावसाळी लोचने .
.................................
हालते आहे कवीची पाकळी अन् पाकळी
चुंबनाधीरा घरी ही नाचरी ओष्ठावली' (पावसाळा, पृ. क्र. ६२)

पावसाळयाच्या माध्यमातून प्रेयसीची प्रियकराला भेटण्यासाठीची आतुरता कवी आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने शब्दबद्ध करतांना दिसतो. त्याचबरोबर दुसऱ्या कडव्यातील शृंगारमय वातावरण विशेष वाटते.

'हसेल रे जग' या कवितेत प्रेयसीच्या मनातील अनामिक भीती , प्रियकराविषयीचे प्रेम व जगाची वाटणारी भीती यांचा संगम निसर्गाच्या सहवासाने व्यक्त केला आहे. 'झाकड पडली', 'वीज कडाडली' 'थयथयत नाचत आले पाणी', 'चुकविली वाट' ह्या प्रतिमा निसर्गाचे सुंदर रुप प्रकट करतात. येथे निसर्गातून आपली प्रीतीभावना व्यक्त करण्यात कवी यशस्वी झालेले आहे यात काही शंका नाही. एकूणच 'शीळ' या काव्यसंग्रहात प्रेमभावना आणि निसर्गातील मोहक प्रतिमा यांची शब्दचित्रे ना. घ. देशपांडे यांच्या कवितेतून पुन्हापुन्हा डोकावताना दिसतात असे म्हणावेसे वाटते.

## ३.२ निसर्गवर्णनपर कविता :

ना.घ. देशपांडे यांची कविता निसर्गाच्या नानाविध रुपातून जन्माला येताना दिसते. निसर्गाचे वर्णन करताना कवीची प्रतिभा कुठेही कमी पडत नाही. कवीला निसर्गाची इतकी ओढ असण्याचे कारण म्हणजे जेथे ते वास्तव्याला होते, तेथचा सभोवतालचा रम्य परिसरच म्हणावा लागेल. दाट वनझाडी , डोंगराळ भू - प्रदेश , नदी - नाले , हिरवाळी , जवळच लोणार सरोवर असे निसर्गरम्य वातावरण त्याच्या काव्याला कारणीभूत ठरते. कवीने निसर्ग व प्रेम यांचा संगम घडविला आहे. त्याचबरोबर काही ठिकाणी त्यांची लेखणी निसर्गवर्णनातच जास्त रमलेली आहे. त्यात प्रामुख्याने 'सुंदरता' , ' रानराणी ' , ' फुला रे ' , ' नदीकिनारी', 'धनगरी गाणे', ' नील जलांनो ' अशा काही कविता आपणास सांगता येतील त्याचा विस्तृत परामर्श खालीलप्रमाणे घेता येईल.

कवी ना. घ. देशपांडे आपल्या ' सुंदरता ' या कवितेत निसर्गातील विविध रुपांचे वर्णन करताना त्यात तारा , गगन , वारा , नभ , सिंधू , नीलारुण घन , विद्युतरेषा यांचा उल्लेख करतात. ही कविता वाचताना निसर्गातील त्या विशिष्ट परिस्थितीचे चित्र डोळ्यासमोर प्रकट होते. ही कविता बालकवीच्या कवितेची आठवण करुन देते.

' सुंदरता ' हे तर निसर्गाचे वैभव. निसर्गातील वैभवता , उदात्तता , रम्यता आपल्या नेहमी प्रत्ययास येत असते. ' सुंदरता ' ही कविता मानवी भाव जरी व्यक्त करीत असली तरी त्यापेक्षा जास्त ती निसर्गाचे रुप वर्णन करताना आपणास दिसते. कवी निसर्गाचे वर्णन करताना म्हणतो -

' सुंदरतेचे मोहक दारुण
घडले दर्शन ओझरतेही
तर मग पुढते हे जग बुडते
एकच उरते ओढ अशी ही '

......................

त्याचप्रमाणे -

‘ क्षण बघतो जो कुणी बिचारा
चिन्मय तारा त्या गगनाची
तो वाऱ्यागत जातो वाहत
छेडत छेडत तार मनाची ’ ( सुंदरता,पृ. क्र. ४६ )

अशाप्रकारे मोहक निसर्गमय वातावरण या कवितेतून कवी निर्माण करतात. ही कविता वाचत असताना निसर्ग आपल्या भोवताली असल्याचा भास होतो.

‘ समाधि ’ या कवितेत कवी समाधीचे वर्णन करताना किडे - पाखरे , माती , खडे , दुर्वांकूर , तरु , ताजी फुले , ऊन , वारा , कावळा या प्रतिमांच्या साहाय्याने समाधीची झालेली दयनीय अवस्था रेखाटतात. ही कविता रसिक वाचक वाचत असताना त्यांच्या डोळ्यासमोर हुबेहुब समाधीचे चित्र उभे राहते. समाधीच्या पडक्या स्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो -

‘ या दूरच्या दूर ओसाड जागी
किडे - पाखरांवीण नाही कुणी :
हा भूमिका भाग आहे अभागी :
इथे एक आहे समाधी जुनी ’
‘ विध्वंसली काळ हस्तांमुळे ही :
हिला या , पहा , जागजागी फटा :
माती , खडे आणि आहेत कांही
हिच्यांभोवती भंगलेल्या विटा । ’ ( समाधि, पृ. क्र. ४२ )

दुरच्या ओसाड जागी असलेल्या या पडक्या समाधीचे वर्णन कवीने अगदी नेमकेपणाने व अचूक केलेले दिसते. ‘ समाधि ’ या कवितेत त्यांची सुक्ष्मनिरीक्षण शक्ती , जिज्ञासावृत्ती दिसून येते.

‘ त्याला नाही कदर ’ या कवितेत कवी प्रासंगिक व अवकाळी आलेल्या पावसाचे सुंदर वर्णन करतात.

‘ माथी झाला सुरु
पिंगा काळा निळा
एकाएकी अस्मानाची न्यारी झाली कळा ’

........................

‘ ओला झाला पदर
साडी चोळी सदर
दगा दिला या दुस्मानानं त्याला ऽ नाही कदर ’

( त्याला नाही कदर, पृ. क्र. ६२ )

या कवितेत ‘ दगा दिला दुस्मानान’ या ओळीतील दुश्मन कोण ? प्रियकर की पावसाळा तसेच ‘ त्याला नाही कदर ’ यातून कुणाला कदर नाही ? हा प्रश्न समोर येतो. कदर कुणाला? पावसाळयाला की प्रियकराला असा प्रश्न वाचकाला पडल्याशिवाय राहत नाही. प्रारंभ ते शेवटपर्यंत एक पावसाळ्याचा छोटासा प्रसंग कथन स्वरुपात येथे आलेला दिसतो. ‘धनगरी गाणे ’ या कवितेत ‘ चांदण्या ’ , ‘ हिरवी हिरवळ’, ‘ रानवेल ’ , ‘ रान ’ , ‘ कोकरू’, ‘ चांदणे हिवाळी ’ , ‘ खोऱ्यांमधी ’ , ‘ कळप’ ‘ मेंढ्या ’ यांचा उल्लेख येतो. ही कविता म्हणजे एक उत्कृष्ट धनगरी गीत होय. हे गीत चालीवर गुणगुणता येते.-

‘ या माथ्यावरती ठळक चांदण्या नऊ;
ही अवती भवती हिरवळ हिरवी मऊ ऽऽ जी !

..................................

ही झुडपें, झाडे , रानवेल साजरे :
चांदणें हिवाळी , मंद , धुंद झांजरें ऽऽ जी ।’

( धनगरी गाणे, पृ. क्र. ७२)

कवितेत कडव्याच्या शेवटाला येत असलेल्या जी ऽऽ जी ! यावरुन ही कविता लोकगीते व लावणी वाङ्मयाचा प्रभाव असलेली कविता असल्याचे स्पष्ट होते. रात्रीच्या चांदण्यात मऊ हिरवळीवर थकून भागून निजलेले कोकरू विशेष वाटते. हिवाळ्यातील रात्रीचे केलेले वर्णन सुंदर बनलेले आहे. ही कविता कवीने आपल्या शेतात रात्रीला बसलेल्या मेंढराना बघून केलेली आहे.

रानाची भव्यता आपल्या काव्यप्रतिभेने शब्दबद्ध करताना कवी म्हणतो -

‘ वाहे झरा ग , झुळझुळ वाणी
तिथं वाऱ्याचि गोड गोड गाणी
तिथं राया तु उभा असशील !
तिथं रायाचे पिकले मळे
वर आकाश शोभे निळे
शरदाच्या ढगाचि त्याला झील ’

( शीळ, पृ. क्र. २५)

येथे झऱ्याचे झुळझुळ वाहणे , वाऱ्याचे गोड गाणे , पिकलेले मळे , आकाशाचे निळे शोभणे यातून रानातील रम्य वातावरण समोर येते. कवीचे निसर्गदृश्यातील तादाम्य आणि कल्पनेचे अपूर्व सामर्थ्य यांचा समसमा संयोग येथे झाला आहे. निसर्गाचे एक चैतन्य रुप साकार करून कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या प्रतिभेचे सामर्थ्य ही प्रकट येथे प्रकट केले आहे.

ना. घ. देशपांडे यांच्या निसर्गकवितेतही त्यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्वाचे पैलू जाणवतात. ‘ फुला रे ’ या कवितेत बंधनाऐवजी ‘ मुक्ती ’ व रहस्याऐवजी त्यातील उघडेपणा कवीला आवश्यक वाटतो. या कवितेत कवी फुलाला सांगतो की , हृद्यात दडलेले रहस्य दडवून न ठेवता ते उघड कर . त्याचा इतरांना देखील लाभ होऊ दे. स्वत:चे मधुजीवन बंदिस्त करु नकोस . कवी फुलाला समजावणी देताना म्हणतो -

‘ तम संकुल सरली निशा

नीलारुण हसली उषा

चौफेर विभा फावली , फुला रे

उघड उघड पाकळी ’

( फुला रे, पृ. क्र. ४८ )

येथे कवी निसर्गात घडणारी सूक्ष्म हालचाल आपल्या काव्यात उत्कटतेने मांडताना दिसतात. त्याचबरोबर प्रीतीची नाजुक भावना ‘ फुला ’ तून व्यक्त होताना येथे दिसते. कवी आपल्या कवितेत काळ्या रात्रीचे अवखळ वादळ वाऱ्याचे , धरेला मिठी घालणाऱ्या आकाशाचे सुंदर वर्णन करतात. त्याचबरोबर ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात निसर्गाची अनेक क्षणचित्रे आल्याची दिसतात.

‘ जरा निळ्या अन् जरा काजळी

ढगांत होती सांज पांगली

ढवळी ढवळी वर बगळ्याची संथ भरारी गऽ ! ’

त्याचबरोबर ,

‘ चौफेर बहरला मळा :

खुले नवकळा , जी !

काळींत दिसे हीवरा

गहूं हरबरा , जी !

लवलवति कसे नाचरे

ओंबिचे तुरे , जी ! ’

( मोटकरी, पृ. क्र ३८)

या ओळी आपण फक्त वाचत नाही तर साक्षात आपण पाहतो असे वाटते. कवीच्या काव्यात अनेक ठिकाणी अशी निसर्गाची क्षणचित्रे आल्याचे आपणास दिसतील.

अशाप्रकारे कवी ना.घ. देशपांडे यांची निसर्गकविता विविध रंगी, विविध रुपे धारण करणारी आहे. कवीने आपल्या काव्यात वास्तवता आणि कल्पनात्मकता यांचा सुंदर मेळ घातलेला दिसतो.

### ०४. जीवनविषयक कविता :

हे जीवन सुंदर आहे ! किंवा जीवन सुख दुःखाचा संगम आहे . जीवन एक संघर्ष आहे. अशाप्रकारची बरेचशी सुभाषिते आपण ऐकत असतो. प्रत्येक व्यक्तीची, कवीची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी भिन्न स्वरुपाची असते. कवी हा आपल्या आयुष्यात कवीतेच्या माध्यमातून जीवनावर दृष्टिक्षेप टाकीत असतो. ' शीळ ' या काव्यसंग्रहात कवीने जीवनविषयक सुख - दुःख सांगणाऱ्या प्रामुख्याने पाच ते सहा कविता सांगितल्या आहेत. ' जीवनकंथा ' , ' जीवनाचे गाणे ', 'हे जीवन', ' ओसाडीत बसून ' या कवितातून समाजजीवन त्यातील रुढी परंपरा , उदासिनता , दैन्यता कवीने व्यक्त केली आहे.

कवी ना. घ. देशपांडे यांची ' जीवनकंथा ' ही कविता संसारकथा असल्याचे दिसते. आपल्या आर्थिक हलाखीच्या परिस्थितीला आपल्या पत्नीने ( ठिगळ लावून ) हातभार लावावा अशी अपेक्षा कवीची आहे. माझ्या आयुष्यातील दैन्यावर , अस्थिरतेवर उदासिनतेवर तुझ्या प्रेमाशिवाय आणखी काही उपाय किंवा आधार नाही असे कवीतेतील पती आपल्या पत्नीला आळवून सांगतो. जीवन सुरळीत चालण्यासाठी जीवनात व्यक्तीला पत्नीचा मोठा हातभार लाभत असतो.म्हणून कवी पत्नीन राग न मानता आपल्याला सोबत देण्याची विनवणी करताना दिसतो. तो म्हणतो -

' चुकी जरी झाली
नको पण रागावूं आता :
अनेक ठिगळांनी
पुरी कर ही जीवनकंथा. ' ( जीवनकंथा, पृ. क्र. ५८ )

15415

‘ जीवनाचे गाणे ’ या कवितेत कवी म्हणतो, माणसाने जीवनाच्या प्रत्येक वळणावर सुखदु:खाला समान मानले पाहिजे व ते सकारात्मकतेने स्वीकारले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता वास्तवाला सामोरे जाणे अतिशय महत्त्वाचे आहे असे कवी स्पष्ट करतो. जीवनात नेहमी सुखाचे क्षण येतील अशी अपेक्षा देखील करु नये. कधी फुल तर कधी निर्माल्य हुंगावे हे सांगताना कवी म्हणतो -

‘ क्षणैक मोहक पाडून भूल
सुकले साजूक नाजूक फुल
आता हे निर्माल्य हुंगूं
जीवनरंगात रंगूं या जीवनरंगांत रंगूं। ’ ( जीवनाचे गाणे,पृ. क्र. ७६ )

येथे कवी सुख दु:खाच्या दोन्ही अनुभूती स्वीकारुन जीवनाचा पूर्ण आस्वाद घेताना दिसतो. येथे कवीची संयमीवृत्ती प्रकर्षाने समोर येताना दिसते.

ना. घ. देशपांडे यांची ‘ हे जीवन ’ ही कवीता जीवनाचा अर्थ सांगणारी आहे. ‘ चिंता माणसाला चितेप्रमाणे जाळते ’ हेच सत्य कवीने ‘ हे जीवन ’ या कवितेत मांडले आहे. चिरदाहक चिंतनात मनुष्याचा सर्व शक्ती क्षीण होऊन मनुष्य मरणाला जवळ करण्याचा प्रयत्न करतो. जीवन गलित बनून आशेचे निराशेत रुपांतर होते. डोळयासमोर केवळ अंधारच दाटलेला दिसतो. तेव्हा कवी म्हणतो -

‘ चिरदाहक चिंतनात चढते - चढते जीवन झुरले , रे !
कसले जीवन आता नुसते - नुसते मरणच उरले रे !
झडली पाने , पुष्पे पहिली
काट्यांची खाईच राहिली :
जीर्ण गलित पर्णातच फुलते - फुलते गुलाब पुरले , रे ! ’

( हे जीवन, पृ. क्र. ६४ )

वरील कडव्यात जीवनाच्या बहराला पान - फुलांची उपमा दिली आहे . हा जीवनाचा बहर संपलेला आहे. म्हणजेच पाने - फुले झडून केवळ काट्यांचे दु:ख तळाशी

राहिले आहे. तळाशी साचलेल्या , कुजक्या पाला - पाचोळ्यात गुलाबही पुरले गेले आहेत. असे सांगून आयुष्यातील आशा , उमेदी मातीत मिसळून गेल्याचे प्रतिपादन या कवितेतून कवीने केले आहे. या कवितेत एक सूर निर्माण होतो. त्यामुळे गजानन वाटवे यांनी या कवितेत गीताचे स्वरुप दिले आहे. कवितेत येणाऱ्या प्रत्येक ओळीच्या शेवटी येणाऱ्या ' रे ' या एकेरी संबोधनाने गीताचे स्वरलालित्य साधण्यास मदत होते. गीताचे नादसौंदर्य वाढते. म्हणून *'अम्लान' या पुस्तकातील 'शीळ' या लेखात* मं. वि. राजाध्यक्ष म्हणतात. '' ना.घ. देशपांडयांच्या काव्यात नादसौंदर्य असले आणि उन्माद ही असला तरी तो तांब्यांच्या पठडीतील नाहीत. तो नाद कोमल व्यंजने बांधून जमा केलेला नाही. त्यात पदलालित्यासाठी संस्कृत समासांचा आसरा घेतलेला नाही. तो जणू अर्थाचेच एक अंग आहे.''[६] असे दिसते. नाद हा कवितेचा एक अविभाज्य भाग असल्याने कवीच्या काव्याबाबत वरील मत योग्य असल्याचे सांगता येते.

' ओसाडीत बसून ' या कवितेत कवीने उदास झालेले जीवन रेखाटले आहे. ओसाडीत बसून याचा अर्थ स्वत:ला बंदीस्त करुन घेणे होय. जीवन जगत असताना मृगजळ अत्यंत प्रिय वाटतो. या मृगजळाचा पाठलाग करताना माणसाची खुपच दमछाक होते. पळून पळून थकल्यावर समजते की, हे सगळचं शून्य आहे. भासमान आहे. या मायाजळात आपण पूर्णपणे अडकलो आहे अशा खिन्न अवस्थेत मग त्याला एकांत प्रिय वाटू लागतो येथे कवी म्हणतो -

' दिसले मृगजळ फिरलं अवखळ हरिण उगाच फसून :
ओसाडित बसून झुरते ओसाडींत बसून
..................................
फिरता वणवण माझें जीवन थकलें वाट चुकून:
ओसाडीत बसून झुरते ओसाडीत बसून . '

( ओसाडीत बसून, पृ. क्र. ३२ )

अशाप्रकारे कवी ना.घ. देशपांडे सुखदु:खाच्या हातात हात घालून जीवन जगताना दिसतात. त्यांनी जीवनात आलेल्या संकटांना सामोरे जाऊन आपल्या जीवनाचा मार्ग काढल्याचे दिसते. अशातही कुठंतरी मानवी मनात निराशेचे वारे येणे साहजिकच आहे. ते कवी रसिक वाचकापासून लपवून ठेवत नाही हे त्यांचे विशेष म्हणता येईल.

## ०५. कौटुंबिक कविता :

कुटुंब ही समाजाची एक महत्त्वपूर्ण संस्था होय. कुटुंबातूनच समाजाची व समाजातून राष्ट्राची निर्मिती होत असते. त्यामुळे कुटुंब या संस्थेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मराठी काव्यात प्रामुख्याने कुटुंबातील सदस्य आई , पत्नी , मित्र फार तर वडिलांवर कविता लिहिलेल्या दिसतात. कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या ' शीळ ' काव्यसंग्रहात आई व पत्नीवर कविता केल्याचे दिसते. कवीची आई ते लहान असतानाच मरण पावल्याने आईच्या प्रेमाला ते पारखे झाले. आईचे प्रेम न मिळाल्याने त्या प्रेमाची त्यांना अधिक ओढ दिसते. त्यातूनच त्यांची ' चुकलेले कोकरु ' ही कविता निर्माण झाल्याचे दिसते. कवी आपला मातृविरह व्यक्त करतांना म्हणतो -

' कुणीच नाही काय नेणत्या पतिताला आसरा ?
कुठेच नाही दिसत, अरेरे , बुडत्याला कासरा !
घरट्याखाली पडलें इवले बिनपंखी पाखरु :
हुरहुर बघते कळपांमधले चुकलेले कोकरु '

( चुकलेले कोकरु, पृ. क्र. ६५ )

आईविना आपण दुबळे पतित बनलो आहे. आपल्याला कशाचाही आसरा मिळत नाही असे जेव्हा कवीला वाटते तेव्हा तो स्वत:ला 'बिनपंखी पाखरु', 'चुकलेले कोकरु' संबोधतो व आई नसल्याची खंत व्यक्त करतो. त्याचे आई प्रति तळमळणे सभोवार बेभान होऊन बघणे तिला हाक देणे त्याच्या मनाची भावविव्हळता व्यक्त करते.

'नेमके परत जाताना ' या कवीतेत कवी नवविवाहीत पती पत्नीच्या मनातील भाव व्यक्त करतो. नवीनच लग्न होऊन घरी आलेल्या जोडप्यातील दुरावा कवी त्यांच्या नाजुक भावभावनासह शद्बबद्ध करताना येथे दिसतात. नववधू आपल्याला पत्नीने आपल्याकडे बघावे , आपण त्यांच्याशी भरभरुन बोलावं अशी मनीषा बाळगते. मात्र घरातील इतर सदस्यांमुळे तिची ही इच्छा पूर्ण होत नाही . पती जेव्हा घरातील इतर मंडळींशी जास्त संवाद साधतो तेव्हा हिचा दूरावा अधिकच वाढत जातो. तेव्हा ती म्हणते -

' छे ! कसा सहूं मी असा दुरावा मुका ?
चांगलेच सारे सारे , वाईट फक्त मीच का ?
मग , दूर मुक्याने बसून बघतें जरी ,
नेमकें परत जाताना हसतात कशाला तरी !'

( नेमके परत जाताना, पृ. क्र. ७१ )

शेवटी निराश होऊन ती एकीकडे मुक्याने जाऊन बसते . तेव्हा तिचा पती बाहेर जाताना मात्र तिच्याकडे बघून स्मित हास्य करतो आणि त्यावेळी तिला समाधान झाल्यासारखे होते अशाप्रकारे कवी नववधूच्या मनाची स्थिती तपशीलवारपणे रेखाटतात. येथे कवितेत आलेल्या नववधू म्हणजे सौ. शांताबाई देशपांडे या होत . त्यांच्या भावभावनेचा प्रत्यक्ष रुप म्हणजे ' नेमके परत जातांना ' ही कविता होय. अशाप्रकारे ना. घ. देशपांडे येथे कुटुंबातील एका प्रसंगाचे उत्कट चित्रण करताना दिसतात. पती - पत्नीच्या अंत:करणातील उत्कट प्रीतीचा आविष्कार येथे झालेला आहे.

' कधी रे आता ' या कवीतेत पत्नी आपल्या पतीशी संवाद करताना दिसते. पतीला ती तुळशीच्या पंक्तीत शेवंती लावण्याचे सुचविते. म्हणजे पावित्र्या बरोबरच सौंदर्य रुजविण्यास सांगते . त्याचबरोबर संसारात पुढे आर्थीक चणचण भासु नये म्हणून अर्थाजन करण्यास प्रेरीत करते. पतीपुढे आपल्यासाठी साडी, चोळीचा , गोफाचा लाडिवाळ हट्ट धरुन बसते. येथे कवी स्त्री सुलभ वर्तन योजताना दिसतात. हट्ट लडिवाळ धरुन बसणारी पत्नी आपल्या

कर्तव्याला मात्र विसरताना दिसत नाही. ती पतीसाठी भाकरी भाजण्यास सुरुवात करताना दिसते. ती म्हणते -

‘ जरीची घ्यावी
तू साडी - चोळी
हसावी मी साधी भोळी ।
- कधी रे आता ?’ ( कधी रे आता,पृ. क्र. ९० )

त्याचबरोबर पुढे

‘ अन् निगोतीन ऽ
फक्त तुझ्याखातर्
सख्या मी भाजावी भाकर ।
- कधी रे आता ?’ ( कधी रे आता, पृ. क्र. ९१ )

कधी रे आता ? या नेहमी नेहमी येणाऱ्या शब्दातून कवीतेत आलेली स्त्री ही हट्टी स्वभावाची असल्याचे दिसते. त्याचबरोबर संसारातील खेळीमेळीचे वातावरण कवी अचूकपणे टिपताना येथे दिसतात.

## ०६. गूढगुंजनपर कविता : ( चिंतनिका )

‘ रिफ्लेक्टिव्ह लिरिक ’ ह्या इंग्रजी काव्यप्रकार संज्ञेचे मराठी रुपांतर म्हणजे ‘चिंतनिका ’ होय. चिंतनिका गीतीकाव्याप्रमाणेच प्रकार असून आत्मनिष्ठ अथवा व्यक्तिनिष्ठ असतो. भावनेइतकेच विचाराला प्राधान्य चिंतनिकेत असते. भावना आणि चिंतन यांचे एकत्रित रसायन म्हणजे चिंतनिका होय. चिंतनिकेतील विचार हे अध्यात्मपर , तत्त्वज्ञानस्वरुपी अथवा साक्षात्कारवादी असतात. अंतिम सत्याचा अनुभव हाच गुढकवितेचा विषय असतो. गुढकवितेतून रम्यगुढ अनुभव निर्माण होतो.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' या काव्यसंग्रहात आलेली ' काळ्यागढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे ' ही कविता गुढगुंजन स्वरुपाची आहे. सेंदूरजन येथे ही कविता कवीने लिहिली आहे. सेंदूरजन या गावात एक प्रचंड पण ओसाड गढी आहे. गढीत असलेल्या आडांतून पारवे फडफडत बाहेर येतात व कधी जोरजोराने हुंकारतात. त्यामुळे येथे भीषण वातावरणाची निर्मिती होते. गढीत झाडाच्या बुडाशी नाग खेळताना दिसतात. तेथे अनेक दाट झुडपे वाढलेली आहेत. कवितेत आलेले हे निसर्गाचे वर्णन रम्यगुढ वाटते. त्याचबरोबर कवीने निसर्गातील रम्यगुढता व मानवी अंत:करणातील प्रेमाबाबतची रम्यगुढता यात साम्य साधले आहे. प्रेम आणि भव्य निसर्ग यांच्यात गुंफण करत कवी म्हणतो -

' काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तूं एकटी बांधून सारे चुडे
वारा किती मंद ग ऽ !
होते किती कुंद ग ऽ !
होता किती धुंद ग ऽ अंधार मागे पुढे । '
' काळी निनावी भिती
होती उभी भोवती
वाटेत होते किती काटे कुटे अन् खडे !
हुंकारला पारवा
तेजाळला काजवा
हातून गेला जरा काळोख चोंहुकडे ।'

( काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे, पृ. क्र. ७९ )

अशाप्रकारे प्रस्तुत कवीतेत रम्यभिषणता त्याचबरोबर रम्य प्रीत यांची अचूक सांगड घातली गेली आहे. भावनेइतकेच विचाराला येथे प्राधान्य आहे. कविता रसिक वाचकाला साक्षात्कार झाल्याचा भास होतो. अशक्य बाब शक्य झाल्याचा आनंद येथे झाला आहे त्याचबरोबर प्रारंभ ते शेवट कवीतेत तपशीलावर वर्णन केले गेले आहे असे दिसते.

## ०७. जानपद कविता :

ग्रामीण भागाचा उत्कर्ष होण्यासाठी महात्मा गांधीनी ' खेड्याकडे चला ' असा संदेश पसरविला आणि सर्व साहित्यिकांचे लक्ष ग्रामीण जीवनाकडे केंद्रींत झाले कवी ग्राम जीवनावर कथा , कविता लिहू लागलेत .'' ग्रामीण जीवनावर असलेल्या कवीतांनाच ग्राम गीते किंवा जानपद गीते म्हटले जाऊ लागले '' या जानपद गीताना ' पॅस्टोरल पोएट्री ' या पाश्चात्त्य काव्यप्रकारास मराठीत गोपगीते , किसान गीते ही नावे पडली . मराठी भाषेत जानपद गीतांचा पहिला काव्यसंग्रह ' सुगी ' हा कवी ग. ल. ठोकळ यांनी लिहीला १९३३ साली प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहात ना.घ . देशपांडे यांच्या चार-पाच कवितांचा समावेश त्यांनी केला .

ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' या काव्यसंग्रह ' मोटकरी ' 'सुगी' ' भिंगरी ' , 'मालन' अशी चार पाच जानपद गीते समाविष्ट आहे. कवीची कविता ही शहरी वळणाची नाही तर ती पूर्णत: ग्रामीण वळणाची आहे. त्याचे कारण सांगताना भ. श्री.पंडीत म्हणतात. '' आडवळणाच्या वस्तीमुळे देशपांड्याचे लक्ष शहरातील हालचालीकडे गेलेले नाही. त्यांनी धनगर, किसान व गवळी यांवर गीते लिहिली आहेत. परंतु ती त्या ग्रामीणांच्या आनंदावर आधारलेले आहेत. ''[७] ग्रामीण जीवन हेच त्यांच्या काव्याचे विश्व असल्याचे येथे दिसते.

'' मोटकरी ' या कवितेत कृषीजीवनाचे चित्रण आले आहे. मळ्यात मोटकरी हा पिकांना पाणी देण्यासाठी मोट सतत चालवत असतो. त्यांच्या या सततच्या परीश्रमामुळे त्यांचा मळा चौफेर बहरला आहे. काळ्या जमिनीत आलेल्या गहू , हरबरा या पिकांनी सर्वत्र हिरवळ निर्माण केली आहे. संध्याकाळच्या प्रहरी काम संपवून श्रमपरीहार्यता व्हावी म्हणून मोटकरी गीत गात आहे. त्याचे हे गीत लावणीच्या ढंगाचे आहे.

'बांधून बैल दावणीं
म्हणा लावणी , जी ! '

( मोटकरी, पृ. क्र. ३९ )

या कवितेत शेतातील मोट हाकलण्याचे वर्णन, पिकांचे वर्णन, , सांजकाळचे वर्णन चित्रमय बनले आहे.

‘ सुगी ’ ही कविता ग्रामीण भागातील सुगीच्या दिवसाचे चित्रण करणारी सुंदर कविता आहे. या कवितेतील नायिका यंदा शेतात आलेल्या भरघोस पिकांचे वर्णन करताना दिसते. या वर्षी आलेले पिक आगळे वेगळे व अधिक समृद्धी घेऊन येणारे आहे. असे ती सांगते, तेव्हा पिकांचे वर्णन करताना ती म्हणते -

‘ चौफेर वनावर फळाफुलांच्या सरी :
डोईवर गेली, बाई , औदांच जवारी तुरी । ’

( सुगी,पृ. क्र. ३१ )

शेताचे राखण करणे , मळणी उफणणी करणे अशाप्रकारच्या शेतीविषयक कामाचा उल्लेख या कवितेत येतो. त्याचबरोबर आपण नववधु या घराला कशी भाग्याची लाभली त्याबाबत ती आपल्या पतीला सांगते . त्याचबरोबर ज्या ईश्वराच्या कृपेने हे सर्व पीक , समृद्धी घराला येत आहे त्याची कृतज्ञता व्यक्त करण्यास ती विसरत नाही. ती म्हणते -

‘ येऊं दे पण , सांगते , भराला सुगी :
वाहीन , माय , अंबाई पहिलीच तुला वानगी !’
..........................................
का उगाचच हसतां मला , अहो घरधनी !
मी खरोखरच भाग्याची लाभते तुम्हांला किती ? ’

( सुगी, पृ. क्र. ३१ )

वरील ओळीतून ग्रामीण परिसर , तेथील पिके , दैवत रीतीरीवाज यांच्या वर्णनातून ग्रामीण जीवन डोळ्यासमोर आल्यावाचून राहत नाही. कवी आपल्या परिसरात असलेल्या ‘ पूर्णा ’ नदीचा , ‘अंबाई देवीचा’ आवर्जुन उल्लेख करताना दिसतो. त्याचबरोबर कवितेत पार , औदांच, लक्ष्मी, नाहिला , जवारी , किनी, वानगी अशाप्रकारच्या खेडुतांच्या भाषेतील

शब्दांच्या पेरणीने मुळचा जानपद थाट अधिकच उठून दिसतो. ग्रामीण भागात शेतामध्ये भरघोस पीक येणे व नववधुचा त्याचवर्षाला घरामध्ये प्रवेश होणे हे नववधुच्या चांगल्या पाय गुणांचे लक्षण समजले जाते. हा ग्रामीण भागातील संकेत या कवितेत आलेला दिसते.

' भिंगरी ' ही कवी ना. घ. देशपांडे यांची सुंदर जानपद कविता होय. ' भिंगरी ' च्या अत्यंत समर्पक प्रतिमेतून कवीने एका अल्लड ग्रामीण किशोरीचे चित्र या कवितेत रंगविले आहे. तिचे वर्णन तिच्या पतीच्या तोंडूनच केलेले असल्यामुळे या कवितेला नाट्यगीताचे स्वरुप प्राप्त झाले आहे. या कवितेला अस्सल ग्रामीण स्पर्श लाभलेला आहे. मळ्यात पाखरांपासून शेत राखणारी , मैनेसारखी गोड आवाज काढून गीत गाणारी , पाखरांना हुर्र करवून त्यांना पिकांवरुन उठवणारी व आपला पदर सावरणारी सखू तिच्या पतीला भूरळ घालते. पिसाट वारा सुटल्यावर घाबरुन आपल्या पतीकडे धाव घेणारी सखू कशी आहे त्याबाबत सांगताना कवी म्हणतो -

' लइ गोड सखूचा गळा
मैनाच म्हणू का तिला ?
अंगावर नवती कळा
उरावर उडवित आली सरी
......................
सारखी करी ' हुरहुरा '
हाणते सखू पाखरा
सावरुन पदरा जरा
मळाभर फिरते ही साजरी'

( गरगरा फिरे भिंगरी , पृ. क्र. ४४ )

मळाभर फिरणारी ही स्त्री दिसण्यास सौंदर्यवती आहे. त्याबरोबर तिच्या भावभावना निष्पाप अशा आहेत. जेव्हा पिसाट वारा सुटतो तेव्हा ती आपल्या पतीचा आधार घेते, तेव्हा तिचा

पती आवेगाने तिचा मुका घेतो ती पण त्याचा हा मुका सहजपणे स्वीकारते. वरचे निळे आभाळ , भोवतालचा स्तब्ध मळा , मोटवणावर उभे असलेले बैल, वाऱ्यावर भिरभिरणारे पाखरे अशा वेळेस दोघांच्या संमतीने घडलेला प्रणयाविष्कार निसर्गचित्राला एक परिपूर्णता आणून देतो. येथे प्रणयापेक्षा दोघांतील जिव्हाळा व्यक्त झाला आहे. ही कविता एक रमणीय निसर्गचित्र बनलेले आहे. निसर्ग व या किशोरीचा साधेपणा रसिक वाचकांच्या मनांत घर करून राहतो म्हणून 'गरागरा फिरे भिंगरी ' ही कविता जानपद गीत म्हणून योग्य वाटते.

## ०८. 'शीळ' मधील गझल :

अर्वाचीन मराठी काव्यात प्रामुख्याने माधवराव पटवर्धन , सुरेश भट यांनी गझल हा प्रकार हाताळल्याचे दिसते. ' शीळ ' या काव्यसंग्रहात ना. घ. देशपांडे यांनी ' आज जाऊं दूर रानी ' ही गझल लिहिली आहे. गायकांनी ती गाऊन ध्वनिमुद्रित केली आहे. ' गझल' मध्ये येणाऱ्या प्रत्येक दोन ओळीच्या कडव्याला ' शेर ' म्हणतात. ' आज जाऊं दूर रानीं ' या कवितेत त्याचप्रमाणे दोन - दोन ओळीचे कडवे बनले आहेत. ' आज जाऊं दूर रानीं ' ही विशुध्द प्रेमभावना व्यक्त करणारी गझल आहे.

' प्रीत ही आली भराला : वेळ ही सौंदर्यशाली
आता जाऊं दूर रानीं : साजणा रे , सांज झाली ।
..........................................
ये , उभ्या विश्वास निंदूं : प्रीतीतालानेच हिंडूं
ही निशा गुंफील आता चांदण्यांची शुभ्र जाळी
........................................
कायदा येथील न्यारा : ये , करुं वेडाच सौदा :
प्रेम दे , अन् प्रेम घे अन् यौवनाची ही नव्हाळी ' (आज जाऊं दूर रानीं,पृ.क्र.६०)

या कवितेत प्रियकर - प्रेयसी यांची प्रीत बहराला आली दिसते. ती अधिक बहरण्यास त्यांना समाजापेक्षा रान जवळचे वाटते . म्हणून प्रियकर - प्रेयसी आपली प्रीत बहरण्यास रानावनाकडे आकर्षित होतात व जातांना समाजाचा व्यवहारी कायदा कायमचा झुगारुन रानातील कायदा ' प्रेम दे , अन् प्रेम घे ' हा आपल्या जीवनाला कायमचा लागू करतात. व्यवहारी जगाची नीती प्रीतीभावनेत बिनकामी ठरते असे कवीला येथे सुचवायचे आहे प्रेमापुढे वित्त , विद्या , मान सारे तुच्छ आहेत असे कवी म्हणतो. येथे कवीची प्रेमावरील निष्ठा अतोनात असलेली दिसते.

## ०९. आध्यात्मिक कविता :

कवी ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' या काव्यसंग्रहातील ' अर्पण ' ही कविता समर्पणशील भाव व्यक्त करते. कवी म्हणतो की, आपले जीवन म्हणजे ईश्वराची देणं होय. त्याने जसे आपणास ठेवले तसे आपण रहावे . ईश्वरच आपल्या जीवनात आघात , घात , अपघात ठरवित असतो. अशी कवीची भावना आहे. जेव्हा कवी पोटाच्या व्याधीने सारखे त्रस्त होतात. तेव्हा ते काळवटून जाऊन आपला जीव ते या ईश्वराला समर्पित करतात ते म्हणतात-

' तरी असूं दे तुझा जिव्हाळा : जीव वाहिला तुला;
दयाळा , फिरव कुठेही तनू !
......................
या जीवाचें भलेबुरे ते तुलाच कळते, सख्या
कशाला घालावी भीड मी !
सुटला झंजावात : कुठेही जहाज जावो सख्या
सुकाणू तूं , नूसतें शीड मी ! '

( अर्पण, पृ.क्र ७६ )

अशाप्रकारे तो परमेश्वरच आपले भले - बुरे बघेल. तोच आपुलकीने आपल्या डोळ्यातील अश्रु पुसेल अशी श्रध्दा कवी व्यक्त करतो. जेव्हा मानवी प्रयत्न असफलतेकडे झुकतात, तेव्हा व्यक्ती ईश्वराकडे धाव घेतो असे दिसते. तसेच कवी या ईश्वराला आपल्या जीवनरूपी जहाजाचा सुकाणू मानतात. कवीचा परमेश्वरावर असलेला विश्वास येथे व्यक्त होतो. त्यांची समर्पणाची वृत्ती येथे दिसून येते.

## १०. सामाजिक कविता :

व्यक्ती हा समाजात वास्तव्यास असल्यामुळे समाजातील सुखदु:खाचा, रीती - रीवाज परंपरांचा त्याच्या लेखनावर प्रभाव होणे स्वाभाविकच आहे. कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्य लेखनावर समाजाचा काहीसा परिणाम दिसून येतो. त्यांच्या ‘ शीळ ’ या काव्यसंग्रहात मोजक्याच पण महत्त्वपूर्ण अशा समाजजीवनावर प्रकाश टाकणाऱ्या काही कविता आलेल्या आहेत. कवीला समाजापेक्षाही निसर्ग अधिक प्रिय वाटत असला तरी समाजाविषयी असलेली त्यांच्या मनातील तळमळ पूर्णत: नष्ट होत नाही.

‘ तूच भिला तर ’ या कवितेत कवी समाजात होत असणाऱ्या चुकीची जाणीव व्यक्तीला करुन देताना दिसतो. आपण जर दुर्बल बनलो , तर हा समाज देखील दुर्बल बनून समाजातील चांगल्या वृत्तीचा ऱ्हास होईल. सज्जनाचा घात व दुर्जनाचा सारखा विजय होऊन समाजाची व्यवस्थित असलेली घडी कायमची विस्कटेल याची खंत कवी मनाला लागलेली आहे. म्हणून कुणालाही न भिता व्यक्तीने दुर्जना विरुध्द लढा उभारावा अशी प्रामाणिक इच्छा कवी व्यक्त करतो व तो म्हणतो -

‘ भिऊ नको रे ! तुच भिला तर
बुडेल हे लवकर जग सारे
हे होतीलच विजयी दुर्जन
आणिक सज्जन अगतिक सारे ’

त्याचबरोबर या बिकट स्थितीवर उपाय योजताना सांगतो -

‘ कर हिरिरीने अन् त्वेषाने

आवेशाने उंच तुझा स्वर :

गगन - धरेला कंपवून तूं

प्रतिरोधाचे आवाहन कर.’

( तूंच भिला तर, पृ.क्र. ८४ )

या कवितेत दुर्जनांच्या अन्याय अत्याचाराला पूर्ण ताकदनिशी प्रतिकार करण्याची प्रेरणा कवी देतात. त्यांची ही कविता उत्कृष्ट सामाजिक कविता असल्याचे दिसते. ही कविता वाचताना केशवसुतांची ‘ तुतारी ’ ‘ स्फुर्ती ’ ह्या कवितांची आठवण आल्यावाचुन राहत नाही. नीतीमान माणसाला जगात महत्त्वाचे स्थान प्राप्त व्हावे अशी कवी आपली इच्छा व्यक्त करतात. यावरुन कवीची समाजाबाबतची असलेली तळमळ स्पष्ट होते.

‘ देवधर्म ’ या कवितेत वर्षानुवर्ष चालत आलेल्या रितीपरंपरांचा मनुष्याचा मनावर असलेला पगडा सहजासहजी घालविणे शक्य नसते हे प्रेयसीच्या माध्यमातून कवीने सांगितले आहे. आजचे तरुण मन त्या सर्व रीती बाजूला सारुन त्यात नवबदल आणू इच्छितो पण त्याला ही मर्यादा पडताना दिसतात. त्या मर्यादा सांगताना प्रेयसी म्हणते -

‘ मलाहि कळते सगळे पण हे मन होते भयभयीत तरी

कशी त्यजू जनरीत तरी !

तशात आहे मी कुलवंता , पापभीरु सुकुमार अशी :

देवधर्म सोडूच कशी ? ( देवधर्म, पृ. क्र. ८५ )

‘ जनरीत ’ ‘ देवधर्म ’ यातून तिच्यावर असलेले सामाजिक बंधने व्यक्त होतात. तत्कालिन स्थितीत स्त्री ही आजच्या प्रमाणे मुक्त स्थितीत असलेली दिसत नाही. तिचा समाजात असलेला वावर चौकटीत बंदिस्त असल्याचे दिसते. तिच्यावर असलेले गाढ सामाजिक संस्कार येथे दिसून येतात.

' ओढ ' या कवितेत कवी ना. घ. देशपांडे तत्कालिन स्वार्थी समाज जीवनाचे चित्रण करताना दिसतात. कवी म्हणतो , आज समाजात पूर्णपणे स्वार्थ भाव बोंकाडलेला आहे. आपला केवळ स्वार्थ साधण्यासाठी जो तो सारखी चढाओढ करुन पतित दलितांना, दुर्बलांना आपल्या पायी तुडवत आहे. त्यांना दुर्बलाचे जीवन म्हणजे किड्या - मुंग्यांचे जीवन वाटते. जगातील स्नेह ममता शून्यवत झाल्याने स्थिर जीवनाला कोठे वाव मिळेल असे वाटत नाही. आपल्याच देशात राहून आपण परके असल्याचा येथे भास होतोय. याच स्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो -

' स्वार्थसंगर हा म्हणा अथवा म्हणा व्यवहार की :
चाली हिरहिर अन् किरकीर ही तर सारखी .
ओरडो , विवळो कुणी : तुडवून या पतितांस हे
धावतात पुढेपुढे सगळे करुन धकाधकी. '

( ओढ, पृ. क्र. ७० )

अशाप्रकारे समाजातील भयाण , विदाहक स्थितीचे वर्णन कवी करतो व शेवटी समाजामध्ये प्रेम , आपुलकी , जिव्हाळा निर्माण व्हावा अशी कवी आपली उत्कट व प्रामाणिक इच्छा व्यक्त करतो. आपल्या घरी जी आपुलकी असते तशाच प्रकारची आपुलकी या भांबावलेल्या समाजात निर्माण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. निष्प्रेम जगाचा निषेध कवीने अनेक कवितेत केलेला आहे. पण कवीला जगाविषयी वैताग आहे. असे म्हणता येत नाही. येथे मं. वि. राजाध्यक्ष यांचे याबाबत मत पाहणे सोयीचे वाटते -

'' कवीला जगाचा वैताग येतो तो त्यातील आपुलकीच्या अभावामुळे , पण यापलीकडे त्याचे जगाशी फारसे भांडण नाही असलेच तर ते जूनेपणाच्या अभिमानाने आहे. ''[८]

अशाप्रकारे ना. घ. देशपांडे यांना भारतीय संस्कृतीतील जुन्या मुल्यांचा अभिमान आहे. त्यामुळे आजच्या जगातील लोकांमधील कमी होणारा जिव्हाळा , प्रेम , आपुलकी

यामुळे ते जगाचा वैताग करतात. भारतीय संस्कृतीतील चांगल्या मुल्यांचा , संस्काराचा ते आदर करतात. त्याचबरोबर ते नवविचारांचा देखील स्वीकार करतात. समीक्षक म. वि. राजाध्यक्ष यांच्या मतात तथ्य असल्याचे येथे दिसते.

## ११. ' शीळ ' या काव्यसंग्रहातील स्त्रीप्रतिमा :

कवी ना. घ. देशपांडे आपल्या ' शीळ 'या काव्यसंग्रहात स्त्रीला केंद्रीभूत मानून कविता करताना दिसतात. स्त्री हीच त्यांच्या काव्याची मुख्य प्रेरणा आहे. कवीच्या कवितेत येणारी स्त्री कधी प्रेयसीच्या तर कधी पत्नीच्या रुपात अलेली दिसते , तर कधी अपवादात्मक मातृरुपात देखील आलेली दिसते. कवीची प्रीती ही स्त्रीवर आहे. तिच्या सौंदर्यावर , रुपावर नाही. ' शीळ ' मधील कवितेत शृंगाराचे , रुपाचे वर्णन येत असले तरी त्यांचे प्रेम केवळ तिच्यावर असल्याचे लक्षात येते. कवीला आपल्या कवितेतील स्त्रीप्रतिमेची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळेच ' खुणगाठी ' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात - " या विश्वाच्या प्रक्रियेत स्त्री हा एक मूलभूत महत्त्वाचा घटक आहे अशी माझी निष्ठा आहे प्राचीन कालापासूनच्या बहुतेक काव्यकृतीत तिचेच गोडवे आहेत ती एक सृजनाची महतशक्ती तर आहेच , पण जीवनात आकर्षण उत्पन्न करणारी एक मंगलमय प्रेरणाही आहे."[१] अशा प्रकारचे स्त्रीचे महत्त्व कवी विशद करतात.

ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' या काव्यसंग्रहातील कवितेतून प्रेयसी , पत्नीच्या लडिवाळ हट्टाचे वर्णन करतात. प्रियकराविना होणारी तिची घुसमट व्यक्त करतात पण तिच्यावर अन्याय अत्याचार झाल्याचे कधी कवीच्या काव्यात वर्णन येत नाही. कवी आपल्या कवितेत स्त्रीला पुरुषासमान दर्जा प्राप्त करुन देताना दिसतात.

ना. घ. देशपांडे यांच्या काव्यलेखनावर त्याच्या वडीलांच्या काव्याचा प्रभाव होता. त्यांचे वडील आध्यात्मिक कविता करीत परंतु कवीची कविता फारशी आध्यात्मिककतेकडे वळलेली दिसत नाही. त्यातल्या त्यात त्यांच्या स्त्रीप्रतिमेवर आध्यात्माचा प्रभाव दिसत

नाही. त्यांच्या कवितेतील स्त्री ही निखळ 'स्त्री ' च आहे. तिला कवीने देवतेचे रुप किंवा आध्यात्मिक उंची प्राप्त करुन दिलेली नाही. त्यांच्या काव्यातील स्त्री - पुरुष प्रणयात एक वेगळी धुंदी आहे. पण ती उत्तानाकडे किंवा अश्लिलतेकडे झुकणारी नाही. त्याचबरोबर त्यांची प्रीती दिव्यभव्यतेकडे किंवा आध्यात्माकडे जाणारी नाही. वास्तविक बालपणी त्यांनी पाहिलेला अनुभवलेला सेंदुरजनचा , मेहकरचा परिसर आध्यात्माला जवळच असूनही त्यांच्या कवितेत आध्यात्म नाही. हे त्यांचे विशेषच म्हणता येईल. कवीची कविता प्रेमात रममाण होताना दिसते. कवितेत प्रेमधुंदी शब्दाशब्दात ओथंबली जाते मात्र देहलालसा देहवर्णन करण्यात कविता गढून जात नाही. याबाबत नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात. -

'' ना. घ. देशपांडे यांची कविता प्रेमधुंद अशी कविता आहे आणि तरीही ती देहलालसा आणि देहवर्णनातच गढून जात नाही तर ती प्रामुख्याने प्रेमाच्या स्वरुपाचा आकलन करण्याचा प्रयत्न करते. अशा आकलनाला प्रत्ययक्षमता त्यांच्या कवितेत प्राप्त होते ती इंद्रियसंवेद्यतेच्या पातळीवर .''[१०]

यावरुन ना. घ. देशपांडे यांची कविता निखळ स्वरुपाच्या प्रेमाचा शोध घेणारी असल्याचे दिसते. त्यांच्या कवितेचा विचार करता नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत यथार्थ असल्याचे दिसते.

ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत येणारी स्त्री ही मुक्त स्वच्छंदी असल्याचे दिसते. ' शीळ ' या कवितेत तिचा हा स्वच्छंदपणा ओसांडून वाहतो. ती आपल्या रायाशी मुक्तपणे बोलते. त्याच्याशी खुल्या मनाने आपल्या मनातील भावभावना , कल्पना तपशिलवार बोलून दाखविते ती म्हणते -

'राया , तुला रे , काळयेळ नाही ।
राया , तुला रे ताळमेळ नाही .।

त्याचबरोबर

' रानिं राया जसा फुलावाणी

रानिं फुलेन मी फुलराणी ।

बाइ , सुवास रानिं भरतील । ’ ( शीळ पृ. क्र. २५ )

ना. घ . देशपांडे यांच्या काव्यात येणाऱ्या स्त्रीची धिटाई पाहण्याजोगी आहे ती म्हणते.

तुझ्यासाठी

कितीदा

तुझ्यासाठी रे ।

............

मी. जगाच्या

सोडल्या

रीतभाती

रीतभाती रे ( तुझ्यासाठी पृ. क्र. ३५ )

त्याचबरोबर -

‘ काळीं निनावी भिती

होती उभी भोवती

वाटेत होते किती काटेकुटे अन् खडे ।

...................

होऊन वेडीपिशी

आली अवेळी अशी :

नाजूक प्रीती तुझी : धारिष्ट्य हे केवढे । ’

( काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे , पृ. क्र. ७९ )

या दोन्ही कवितेत प्रेयसीची धिटाईच व्यक्त होते. प्रियकरासाठी ही प्रेयसी आपले जग , रीतीभाती सोडण्यास तयार झालेली दिसते. त्याचबरोबर तिचे प्रियकराला काळोख्या रात्रीला भेटायला येणे यातून तिला लागलेली प्रेमाची ओढ व्यक्त होते ‘ कंचनी ’ या कवितेतील ‘ स्त्री ’ ( प्रेयसी ) रानाशी संवाद साधणारी आहे.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यात येणारी स्त्री ही ग्रामीण असल्याचे दिसते. ' मोटकरी ' 'सखू ' ' गरगरा फिरे भिंगरी ' या कवितेत आपल्या प्रेयसीला कवी 'सखू ' संबोधतो. ही सखू खेड्यात शेतामध्ये वावरणारी शेताचे राखण करणारी आहे. तिला पतीविषयी नितांत आदर व प्रेम आहे. तिची चाल नाचरी असून बोलणे लडिवाळपणाचे असल्याचे दिसते. कवी तिच्या चालण्याचे , बोलण्याचे तिच्या लावण्याचे वर्णन करताना म्हणतो -

' लडिवाळ हिचें बोलणे
चाल नाचरी :
फडफडून राघू म्हणे '
' सखू साजरी ऽऽऽऽ जी '। ( सखू पृ. क्र. ३७ )

अशाप्रकारचे तिचे वर्णन साध्या , सोप्या पध्दतीने झाल्याचे दिसते. ग्रामीण असलीतरी प्रेमाचा वेडा सौदा करणारी व प्रियकर हेच तिचे सर्वस्व मानणारी स्त्री येथे दिसून येते. त्याचप्रमाणे 'कशाला , सखू , रुसावं ऽ तरी । ' या कवितेत देखील कवीने ग्रामीण भागातील स्त्रीच्या लावण्याचे , तिने केलेला शृंगाराचे वर्णन केले आहे. कवी या कवितेत म्हणतो-

' हा पदर शिरावर; नव्या उरावर तुला गळाभर ऽ सरी :
कशाला , सखू , रुसावं ऽ तरी ।
तूं लावण्याची कळा;
नजरेत कसब आगळा :
उरानुवरावर नवी नव्हाळी : चिरी कपाळी जरी : '

('कशाला ,सखू , रुसावं तरी', पृ. क्र. ७२ )

डोक्यावर पदर ठेवणारी , गळाभर सरी असलेली ही ग्रामीण स्त्री लावण्याने परिपूर्ण आहे. तिच्या नजरेत असलेला कसब आगळा - वेगळा आहे . कपाळावर कुंकु लावणारी ही स्त्री सभ्य व घरंदाज असल्याचे स्पष्ट होते.

‘ देवधर्म ’ या कवितेत आलेली स्त्री ही आपल्या प्रियकरांवर अतोनात प्रेम करणारी आहे. त्यांचे प्रेम पूर्ण शुध्द स्वरुपाचे आहे. पण त्यांच्या या प्रेमात समाज , त्यातील परंपरा, रीतीरिवाज यांचा अडथळा आहे. त्याचबरोबर या प्रेयसीच्या मनावर समाजाचे गाढ संस्कार आहे मात्र तेवढेच हिचे आपल्या प्रियकरावर देखील प्रेम आहे. अशावेळेला प्रियकराची बाजू स्वीकारावी की समाजाची ? असा प्रश्न तिच्या समोर उभा राहतो. तेव्हा तिच्या प्रेमाला मर्यादा पडताना दिसतात. ते सांगताना ती म्हणते -

‘ मलाहि कळतें सगळे पण हें मन होते भयभीत तरी :<br>
कशी त्यजूं जनरीत तरी ।<br>
तशांत आहें मी कुलवंता , पापभीरु सुकुमार अशी :<br>
देवधर्म सोडूंच कशी ? ’ ( देवधर्म पृ. क्र. ८५ )

आपली मर्यादा व्यक्त करताना दिसते. अशाप्रकारे ‘ शीळ ’ काव्यसंग्रहात आलेली स्त्री ती मर्यादा व्यक्त करीत असली तरी तिचे प्रियकरावर असलेले प्रेम कमी आहे असे अजिबात कवितेत दिसत नाही. उलट त्यांच्यातील प्रीतीभाव अधिकच हळूवार बनतो. कवीच्या कवितेत येणारी प्रीती ही संयमाचा संपुटात सामावून जाणारी आहे. ‘ या रामपहारी ’ या कवितेतील भयभीत झालेली स्त्री सुध्दा ग्रामीण आहे. ना. घ. देशपांडे यांच्या अनेक कवितात ग्रामीण बोलीभाषेतील शब्द येतात. ग्रामीण निसर्गाचे चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळते. किंबहुना त्यांच्या कवितेतील स्त्री ही ग्रामीण भागात वावरत असल्यामुळे, शेतात राबणारी असल्यामुळे तिच्या अंगी मुळातच धिटाई आलेली आहे. तिची ही धिटाई तिच्या प्रेमभावनेत व्यक्त होताना दिसते. त्यामुळे ती आपल्या प्रियकराला व्यवहारी, स्वार्थी जगापासून दूररानी घेऊन जाण्याची कल्पना व्यक्त करते.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या ‘ शीळ ’ काव्यसंग्रहात प्रेयसी , पत्नी क्वचित माता यांच्या रुपात स्त्री व्यक्त झाली आहे. प्रेयसी ही मनापासून प्रेम करणारी , प्रियकरावर जीव ओवाळणारी दिसते. पत्नीच्या लावण्यांचे वर्णन कवितेत आले आहे. संसाराचा रथ

योग्यरीत्या ओढणारी पत्नी येथे दिसते. पतीला ती कामात हातभार लावणारी आहे. पत्नीच्या रुपातून विवाहीत स्त्रीच्या मनातील नाजूक हळूवार भावभावना कवीने टिपलेल्या दिसतात व मातेच्या रुपातून मुलाचा असलेला मातृविरह व्यक्त होतो.

'शीळ' काव्यसंग्रहातील बहुतेक कवितेतून स्त्रीच्या भावना आत्मनिष्ठपणे अभिव्यक्त झाल्या आहेत. क्वचित कवीच्या आत्मनिष्ठ भावनाही पुरुष प्राधान्यातून व्यक्त झाल्या आहेत. असे दिसते. अशाप्रकारे ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहात येणारी स्त्री ही नाजूक भावभावना जपणारी पण अंगी धिटाई बाणणारी , विशुध्द प्रेम करणारी तर कधी प्रियकराला प्रेमात व्याकुळ करणारी स्त्री व्यक्त होते. या स्त्रीच्या मनावर समाजाचे गाढ संस्कार असलेतरी ती प्रेमापुढे त्या सर्व गाढ संस्कारांना बाजूला सारू इच्छिणारी आहे तिचे आपल्या प्रियकरावर अतोनात प्रेम आहे. तिची ही प्रितिभावना सच्ची आहे पण या प्रीतीत जेव्हा समाज अडथळा बनून येतो, तेव्हा ती आपल्या प्रियकराला दुरानी घेऊन जाण्यासाठी तयार होते. कवी ना. घ . देशपांडे यांनी स्त्री मनाचा अचूक वेध घेतल्याचे आपणाला अनेक कवितेत दिसेल.

## १२. 'शीळ' काव्यसंग्रहाचे रचनावैशिष्टये :

ना.घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहात एकूण ब्याऐंशी कविता आहेत. त्या कविता रचनेनुसार भिन्न भिन्न स्वरुपाच्या आहेत. ' शीळ ' काव्यसंग्रह समजून घेताना त्यातील कवितांचा आकृतिबंध रचना व त्यातील गुणविशेष पाहणे गरजेचे ठरते.

### १२.१ शीर्षकाची अन्वर्थकता :

कवी ना. घ. देशपांडे यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नाव ' शीळ ' आहे. ' शीळ ' म्हणजे हाक देणे . आवाज देणे होय. रानात अंतरावर असलेल्या प्रेमिकानी एकमेंकाना दिलेली हाक म्हणजे ' शीळ '.

' शीळ ' या शीर्षकाबाबत विचार करताना काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठाचा विचार करावा लागेल. या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर एका स्त्रीचे चित्र दिले आहे. ती स्त्री उभी असून शालीन व मृदू स्वभावाची असलेली दिसते. डोक्यावर पदर ,नाजुक शरीरयष्टी, हातात चुडे घातलेली ती आहे. आकाशात चंद्र, चांदण्या व काही ढग दाखविले आहे. पाखरे, फुले , झाडाची पाने , उगवते कमळाचे फुल यातून निसर्गरम्यता , नाजूकता असलेले वातावरण जपलेले आहे. येथे स्त्री ही प्रेमाचे प्रतीक व इतर बाबी निसर्गाचे प्रतीक आहेत. निसर्ग व प्रेम यांचा सुसंगम येथे साधलेला दिसतो. त्याचबरोबर ' शीळ ' ही प्रेमातही असते. त्याचबरोबर रानातही असते . शीळ देतांना मुखातून लांब असा स्वर निर्माण होतो त्यातून नाद निर्माण होतो. त्याचबरोबर शीळ ही प्रेमाने द्यायची असते म्हणजेच त्यात प्रेम ही असते. नाद व प्रेम यांच्या सरमिसळतेतून शीळ निर्माण होते व या कवितेत वरीलप्रमाणे नाद व प्रेम एकत्र आले आहे. म्हणून कवीने काव्यसंग्रहाला दिलेले 'शीळ' हे शीर्षक योग्य वाटते.

डॉ. कल्याण इनामदार आपल्या ' मराठी गीतरचना १९४० ते १९८० स्वरुप आणि विकास ' या पुस्तकात ' शीळ ' या शब्दाचे तीन अर्थ लावताना दिसतात. त्याचा आपण येथे परामर्श घेऊ या .

१. **' शीळ '** एकदा तोंडातून बाहेर पडली की , तिचे सूर आपोआप अवतीभवती विखुरले जातात. त्यांना आपोआप दिशा मिळते, तसेच प्रेमाचेही आहे. प्रेमाची वार्ता ही मुद्दाम कुणाला सांगावी लागत नाही.

२. **दुसरा अर्थ** - शीळ एकदा तोंडातून निसटली की, ती परत घेता येत नाही. सुटलेल्या बाणासारखा तिचा बोभाटा करणारा परिणाम ठरलेलाच असतो , तसेच घडलेल्या प्रेमाचा बोभाटा करणारा परिणाम ठरलेलाच असतो.

३. **तिसरा अर्थ** - ' शीळ ' हे नाजूक , नादलुब्ध संवेदनेचे आकाराला आलेले परिपक्व प्रस्फुरण असते. तसेच प्रेमही आत्मिक भाव - भावनांच्या संवेदनांच्या एकमेकांच्या

मनावर उमटलेला ठसा असतो. ' शीळ ' हा शब्द गीतामध्ये असा प्रेमाचे प्रतीक म्हणून येतो.[११] अशाप्रकारे डॉ. कल्याण इनामदार यांनी 'शीळ' या शीर्षकाचे अर्थ लावले आहे.

**१२.२ ' शीळ ' काव्यसंग्रहातील कवितांच्या शीर्षकाबाबत :**

कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेचे शीर्षक भा. रा. तांबे यांच्या कवितेसारखीच आहेत. कवीने ' शीळ ' मधील कवितेला दिलेली शीर्षक कोणी कोणाला तरी उद्देशून बोलत आहे अशी वाटतात.

उदा. शीर्षके -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ये जरा जवळ , राजसे ऽ | - | प्रियकर प्रेयसीला आपल्याजवळ बोलावताना येथे दिसतो. |
| २. | तुझ्या माझ्यात ग ऽ | - | प्रियकर प्रेयसीशी संवाद साधतो. |
| ३. | तुला किनी ग ऽ | - | प्रियकर प्रेयसीला उद्देशून बोलतो. |
| ४. | आलीस कशाला ? | - | प्रियकर प्रेयसीशी बोलताना दिसतो. |
| ५. | कधी रे आता ? | - | या शीर्षकातून प्रेयसी प्रियकराशी संवाद करीत असल्याचे दिसते. |

याचप्रमाणे ' हसेल रे जग ' , ' नको येऊ तूं ' , ' तूं ' , ' आज जाऊं दूर रानीं ' ही शीर्षके कुणाला तरी उद्देशून बोलत असल्यासारखे वाटतात.

' सुंदरता ' , ' रानराणी ' , ' नदीकिनारी ' , नीलजलानों ' अशी निसर्गविषयक शीर्षक या काव्यसंग्रहात आलेली दिसतात. त्याचबरोबर ' काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे ' ' समाधी ' ' ओसाडीत बसून ' आज जाऊं दूर रानीं ' या शीर्षकातून एखादा स्थानाची जाणीव होतो. या शीर्षकात सूचकता आलेली आहे. ' मोटकरी ' , ' सुगी ' , ' भिंगरी ' , ' धनगरी गाणे ' इत्यादी शीर्षकातून कृषिजीवन डोळ्यासमोर येते . ही कृषिजीवन डोळ्यासमोर आणणारी शीर्षक होत.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेची शीर्षक नाजूक , तरल व प्रेम दर्शविणारे आहेत. त्यांना त्यांच्या शीर्षकातून काही सांगायचे आहे अशाप्रकारे वाटते. काही शीर्षकात लयबध्दता आहे. तर काही शीर्षके नाटयात्म स्वरुपाचे आहेत.

**१२.३ गेयता :**

मराठी साहित्यात गेय कवितेला प्राचीन परंपरा लाभली आहे. गेय काव्याचा संदर्भ जुन्या काळातील गाथा सप्तशतीतील स्त्री गीतात आढळून येतो. कवी ना. घ. देशपांडे यांच्या बहुतांश कवितेत गेयता हा गुण जाणवतो. कवी आपली कविता मुद्दामहून गेय बनवित नसून त्यांच्या स्फुर्तीने काव्यात गेय स्वरुप येताना दिसते. कविता गेय कशी बनते याबाबत डॉ. सुधीर रसाळ म्हणतात. " कवितेच्या या अंगीभूत लयीवर सुरांची एक रचना बसविली गेली की , ती कविता गेय होते."[१२] त्यांचे मत योग्य वाटते .

मराठी साहित्यात भा. रा. तांबे , रविकिरण मंडळातील कवी यांनी गेयता काव्यात अधिकाधिक आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ना. घ. देशपांडे यांच्या बहुतांश कविता गेय आहेत. म्हणून ते गेयकवी ठरतात. ' शीळ ' काव्यसंग्रहात आलेल्या कवितेत नाद , लय, ताल, ठेका , सुर हे सर्व घटक योग्यरीत्या जुळून येत असल्याने काव्य गेयरुप होऊन चालीवर म्हणता येते. कवीची ' शीळ ' ही कविता गेयतेचे उत्तम उदाहरण सांगता येईल.

' रानारानांत गेली बाइ शीळ !
रानारानांत गेली बाइ शीळ !
राया तुला रे , काळ येळ नाही !
राया तुला रे , ताळमेळ नाही ! ' ( शीळ पृ. क्र. २५ )

जी एन. जोशी यांनी गायिलेल्या या गीताच्या धृपदातूनच प्रेयसी तिच्या प्रेमाची शीळ रानोमाळ पसरल्याचे कथन करते. प्रियकर प्रेयसी यांचे मनोमिलन या कवितेत आहे वाणी - गाणी , सुगी - उगी , गळा - शिळा , अशाप्रकारे यमक साधल्याने काव्यात गोडवा , लय निर्माण होते व कविता गेय रुप धारण करून गीतात रुपांतरीत होते. या कवितेप्रमाणेच

' नदीकिनारी ' ' आज जाऊ दूर रानी ', ' ये जरा जवळ ', ' राजसे ग ऽ ', ' किशोरी ', ' गरगरा फिरे भिंगरी ' अशा गेय स्वरुपाच्या कवितांचा उल्लेख येथे करता येईल बा. भ. बोरकर गेयतेबाबत आपले मत सांगतात,

" मला गुणगुणता गुणगुणताच कविता सुचते."[१३]

पण कवी ना. घं . देशपांडे यांच्या बाबतीत आपणाला उलट सांगता येईल. कवी आपली कविता अगोदर लिहित नंतर ती गाण्यासाठी योग्य आहे असे ठरविले जायचे. गेयता हा त्यांच्या काव्याचा मुख्य गुणविशेष आहे. गेयतेमुळे त्यांचे काव्य अधिक खुलून आलेले आपणास दिसते.

**१२.४ ' शीळ ' ची काव्यशैली :**

कवी ना.घ . देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहातील शैली प्रकर्षाने समोर येते. ' शीळ ' मध्ये वापरलेली भाषाशैली सरळ, साधी , सोपी , व उत्कट अशी आहे.त्यांच्या कवितेत वऱ्हाडी बोलीतील शब्दाचा उपयोग , लावणी व गीतांचे एकजिनसी मिश्रण आलेले दिसते. ' शीळ ' काव्यसंग्रहातील कवितेची शीर्षके वाचकाला आकर्षून घेतात. रसिक वाचकाला ' शीळ ' काव्यसंग्रहातील कविता सहज उलगडतील अशा आहेत. तरीपण ज्या कविता लवकर उलगडत नाही त्या कवितेची पार्श्वभूमी समजून घेऊन वाचन केल्यास ती कविता सहज उलगडले. उदा. ' शीळ ' ही कविता सुरवातीला समजण्यास थोडा कालावधी लागतो. मात्र या कवितेमागची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास ही कविता रसिक वाचकास सहज उलगडते. भाषा चटकदार , लयबध्द स्वरुप असल्यामुळे वाचक कविता वाचण्यास रंगून जातो. तरुण मनाला ना. घ. देशपांडे यांचे काव्य म्हणजे त्या काळात मेजवानीच होती आजही त्या मेजवानीची चव अबाधित राहिल्याचे दिसते.

कवी ना. घ. देशपांडे यांनी कवितेत वापरलेल्या प्रतिमा, प्रतिक , संकेत हे आधी विचार करुन निर्मिलेले नाहीत तर ते कविता लिहित असताना सहजपणे प्रकट झालेले आहेत. त्याच्या शैलीचे विशेष म्हणजे त्याची कविता वर्तमानकाळात वावरत असल्याचा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भास होतो. कविता वाचताना त्यातील आशयाचे चित्र डोळ्यासमोर तरळताना आपणास दिसते. हे सामर्थ्य त्याच्या शैलीचेचे म्हणावे लागेल. त्यांची कविता प्रियकर - प्रेयसी यांना केंद्रबिंदू मानते. त्याच्या कवितेत नाजूकपणा , हळूवारपणा ठासून भरला आहे. त्याच्या कवितेत ओळीओळीतून साजूक शब्द भेटतात. अनुप्रासांची कवितेत रेलचेल आहे. यमके आहेत पण त्यांना यांत्रिक रुप येताना दिसत नाही. नाजूकपणा हे त्याच्या शैलीचे विशेष जाणवते. भाषाशैली नितळ व पारदर्शी अशी बनलेली आहे. कवी आपल्या कवितेत 'राना' चाच भाव व्यक्त करीत असल्यामुळे भाषाही तशीच मनोहारी, रमणीय - बहरलेल्या रानाप्रमाणे उमटली आहे. विदर्भातील अनेक लोकगीताचे संस्कार त्यांच्या काव्यावर झाल्याचे दिसतात. 'ये जरा जवळ , राजसे गऽ ! ' ' सखू ' ' मोटकरी ' , ' धनगरी गाणे ' , ' कशाला , सखू रुसावं तरी ! ' ' गरगरा फिरे भिंगरी ' ' तुला किनी ग ऽ ' ' राजसा आता ' या कवितांत लोकगीताचे संस्कार उमटलेले दिसतात.

ना.घ. देशपांडे यांच्या काव्यात ग्रामीण तसेच नागर भाषेचे मनोहारी मिश्रण आहे. कवी नागर किंवा शहरी भाषेचा वापर जास्त करतात. मात्र कवितेत अधूनमधून ग्रामीण बोलीतील शब्द वापरतात. योग्य त्या ठिकाणी ग्रामीण बोलीतीलच शब्द वापरल्यामुळे आशय अधिक अर्थघन होऊन जातो. आशयाची तीव्रता व्यक्त करण्यासाठी बोलीभाषा उपयुक्त पडताना दिसते. कवी वैदर्भीय बोलीतील शब्दाचा वापर ' शीळ ' काव्यसंग्रहात करताना दिसतात. वैदर्भी असे शब्द जे इतर प्रदेशातील मराठवाडा, कोकण , पश्चिम महाराष्ट्र या भागातील लोकांना उमगत नाही असे शब्द त्याच्या काव्यात सहज येतात. 'नाहिला ' , ' औंदाच ' ' किनी ' , ' चंदीर ' , ' दाविते ' , ' नवाई ' , ' गोठबांगडी' , 'नव्हाळी ' , ' दावी ', ' निडांत ' , ' रानकाळी ' , ' पराण्या ' , ' बेपारी ', अन् निगोतीन इत्यादी अशाप्रकारे सांगता येतील. त्याचबरोबर ओसाडी (कोपरा ) , भवताली (भोवताली), कैक (कित्येक) , फटा ( फट , रेघ ) , गुढघा ( गुडघा ) , येंड ( वेडा ) लेकरुं ( मुलगा) डावलून बसणे ( हरवून बसणे ) , बावरी ( भोळी ) , एकली ( एकटी ) हरघडी ( प्रत्येक

वेळेला ) अशाप्रकारे वऱ्हाडातील खास ग्रामीण बोलीभाषेतील शब्द काव्यात आल्याचे दिसते. ग्रामीण बोलीभाषेचा काव्यात वापर कवी अचूकपणे करताना दिसतात. अशाप्रकारचे ओळखीचे पण बोलीभाषेतून आलेले शब्द कवितेला ताजेपणा बहाल करतात. हे शब्द प्रादेशिक असूनही अर्थ उमगण्यास अडथळा येत नाही. ना. घ. देशपांडे यांची भाषा वाचक रसिकाशी संवाद साधते. भाषेमुळे त्याची कविता दुर्बोध किंवा क्लिष्ट बनल्याचे दिसत नाही.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यशैलीचे एक मुख्य विशेष म्हणजे त्यांच्या काही कवितात गद्यात्मक भाषाशैलीचा वापर झालेला आहे. उदा. ‘ किती ’ या कवितेत कवी म्हणतो -

“ आता कशी पुरावी भाषा अशी परावी ?
नि:शद्ब जीवनाला वाचा कधी फुटावी ?
सांगा , कधी निघावे हृदयबंध , विश्वदेवा ?
टाकू किती उसासे ? आशा किती धरावी ? (किती पृ.क्र. ४७)

कडव्यातील प्रत्येक ओळीत प्रश्नचिन्ह असले तरी भाषा, रचना काहीशी गद्यात्मक स्वरुपाची असलेली जाणवते. कवी ना. घ . देशपांडे आपल्या कवितेत संस्कृतप्रचूर शब्दांचा वापर करतात पण या शब्दांचा वापर करताना ओढाताण करुन काव्यरचना केल्याचे दिसत नाही. याबाबत मं. वि. राजाध्यक्ष ‘ शीळ ’ काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात -

“ ना.घ. देशपांडे यांनी मुख्यत: जिवंत बोलीतून आपली ‘ शैली ’ बांधलेली असली तरी ठायी ठायी कधी विशिष्ट अर्थच्छटा दाखवण्यासाठी तर कधी रसाच्या ओघात, संस्कृत शब्दाचा वापर विनासायास केला आहे.”[१४]

बोलीभाषेतील भावनांना जिवंत करण्याची शक्ती ना. घ. देशपांडे यांच्या शब्दकळेत असून क्वचित संस्कृत किंवा प्रमाण मराठी भाषेतील शब्दांचा वापर केला आहे. हा वापर ही कवितेच्या गेयतेस उपयुक्त ठरावा असाच असल्यामुळे ना. घ. देशपांडे यांच्या काव्यशैलीला एक वेगळा मोहकपणा आला आहे.

**१२.५ प्रतिमा विचार :**

कवीच्या अबोध मनातील चिंतनातून प्रतिमांची निर्मिती होत असते त्यामुळे प्रतिमा ही परस्पर विरोधी किंवा परस्पराकर्षी सुध्दा असते. प्रतिमा ही कवीच्या वैयक्तिक , मानसशास्त्रीय प्रक्रियेशी जुळलेली नाळ असते. प्रतिमांच्या आधारे कवीच्या अंर्तमनाचा सहज शोध लागतो. त्याचबरोबर कवीच्या अंतर्मनातून प्रतिमा साकार होतांना दिसतात. ना. घ. देशपांडे यांच्या कवितामधून प्रतिमांचे रंगप्रतिमा , जैविक प्रतिमा , नैसर्गिक आणि भौतिक प्रतिमा , नाद प्रतिमा , दृक प्रतिमा , प्राणी प्रतिमा , गंधप्रतिमा असे भिन्न स्तर व्यक्त करता येतील.

१. **रंगप्रतिमा :** कोणताही कवी रंगाचा वापर करुन आपल्याला सांगावयाचा विषय अधिक अर्थगर्भ बनवित असतो. त्यासाठी तो विविध रंगाचा उल्लेख आवर्जुन करतो. एखाद्या कवीला एखाद्या रंगाविषयी विशेष ओढ असल्याचे जाणवते. कवी त्या विशिष्ट रंगाचा अधिक वापर करतांना दिसतो. 'शीळ' काव्यसंग्रहात पहिल्याच कवितेत कवी आकाशाच्या निळ्या रंगाचा उल्लेख करतात. ते म्हणतात -

' तिथं रायाचे पिकले मळे;
वर आकाश शोभे निळे '

( शीळ, पृ. क्र. २५ )

' निळे आकाश ' ही रंगप्रतिमा येथे उत्साह व व्यापकत्व दर्शविण्याचे काम करताना दिसते. त्याचबरोबर 'ढवळी रात' , 'गहन अंधार', 'ढवळे ढग' , 'ढवळी निशा' या रंगप्रतिमातून येणाऱ्या दु:खाचे सावट व्यक्त होताना दिसते. त्याचबरोबर त्यातून मनाची गोंधळलेली स्थिती व्यक्त होते. ' काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे ' या कवितेतून गढी व त्यातल्या त्यात ओसाड असलेली. येथे ओसाड गढी या रंगप्रतिमातून गूढगुंजन निर्माण होते. त्याचबरोबर भितीदायक वातावरण निर्मिती होते. ' हिरवी साडी ' लालबुंद चोळी ' या रंगप्रतिमातून उन्माद व्यक्त होतो.

‘ सळसळली ग ऽ हिरवी साडी :

तिनेच केली तुझी चहाडी :

फडफडल्या पदराच्या पिवळ्या लाल किनारी , ग ऽ !’

( नदीकिनारी , पृ. क्र. ५९ )

‘ फार नको वाकूं ’ या कवितेत आलेली ‘ निळे डोळे ’ ही प्रतिमा उत्साह , आनंद दर्शविते. कवी म्हणतो -

‘ दोन निळे डोळे

तुझे फार फंदी

साज तुझा आहे

जुईचा सुगंधी ’. ( फार नको वाकूं पृ. क्र. ७० )

सप्तरंगी , सप्तरंगी प्रीत , पंचरंगी सूर , सप्त सूर यां रंगप्रतिमातून प्रीतीमधील विविध छटा व्यक्त होतात. ‘ हिरवळ हिरवी ’ या प्रतिमेतून समृध्दी व्यक्त होते. याचबरोबर इतर कवितात घननीळ , अवकाश काळे काळे , तरंग पिवळे , नीलारुण , गौर खांदा बहुरंगी कल्पना , निम्नगोरी अंगकांती , चांदण्याची शुभ्र जाळी , पिंगा काळा निळा , हिरवी चिडी , बहुरंगी अनिवार , पिवळ्या लाल किनारी , मुक्त काळी वेणी तरंग पिवळे अशा अनेक रंगप्रतिमा या काव्यसंग्रहात आला असल्याचे सांगता येईल.

**२. दृक प्रतिमा :**

एखादा विशिष्ट शब्द वाचल्याबरोबर त्याचे डोळ्यासमोर चित्र उमटत असेल तर ती दृक प्रतिमा ठरते. ‘ शीळ ’ काव्यसंग्रहात ‘ निजले रान ’ ‘ वाळूत चुंबिले पाऊल ’ ‘पावसाळी लोचने ’ ‘ चिरी कपाळी ’ निम्नगोरी अंगकांती ’ ‘ गौर खांदा ’ अशाप्रकारच्या दृकप्रतिमा आलेल्या आहेत. ‘ पावसाळा ’ या कवितेत कवी म्हणतो -

‘ चिंब झाली पावसाने भोवती रानोवने :

वर्षती येथे सखीची पावसाळी लोचने . ( पावसाळा पृ. क्र. ६२ )

' पावसाळी लोचने ' ही प्रतिमा ऐकल्या बरोबर सखीच्या डोळ्यातील अश्रू गळतानाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर निर्माण होते व येथे 'पावसाळी लोचने ' ही दृक प्रतिमा ठरते. 'येशील का रे ? ' या कवितेत ' वाळूंत चुंबिले पाऊल तुझे ' ही प्रतिमा दृक ठरते.

' अवती भवती नव्हते दुजे :

वाळूंत चुंबिले पाऊल तुझे ' ( येशील का रे ? पृ. क्र. २३ )

वाळूत उमटलेलीपाऊल चुंबण्याची क्रिया डोळ्यासमोर चित्ररुपात येते. त्यामुळे ही दृक प्रतिमा ठरते. निम्नगोरी अंगकांती, गौर खांदा असे उच्चारल्यावर तशी प्रतिमा डोळ्यासमोर उमटते असे दिसते.

### ३. नाद प्रतिमा :

' मालन ' या कवितेत झरा गायन गात आहे. वेलीचे पान जरासं सुध्दा हलत नाही' यातून नादाची निर्मिती होते व नाद प्रतिमा निर्माण होते. 'मोटकरी ' या कवितेत ' ही मोट भरे भराभरा; चढे करकरा जी !' मोटेचे करकर वाजणे यातून नाद निर्माण होतो. ( पृ.क्र. ३८ ) , काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे ' या कवितेतून हुंकारला पारवा ही नाद प्रतिमा समोर येते. पारव्याचे हुंकारणे म्हणजेच आवाज करणे होय. ' कुजबुजली भवताली राने' यातून रानाची कुजबुज व्यक्त होते. ( पृ.क्र. ५९ ) वाऱ्याचे पिसाट वाहणे (पृ.क्र. ५९ ) , शांत वातावरणात हळूच 'कंकण कुजबुजणे ( पृ.क्र. ४१ ) , किणकिण किणकिण रुणझुण रुणझुण (पृ.क्र. ४१) यांतून एक नाद निर्माण होतो. झीमझीम झडीच्या धारा पडणे (पृ.क्र. २९ ) या सर्व प्रतिमा नादयुक्त असल्याने येथे नादप्रतिमा ठरतात.

### ४. गंध प्रतिमा :

' अजून ' या कवितेत गंध प्रतिमा आलेली आहे कवी म्हणतो की -

' सर्व रात्रभर निजला ,

जिवलगा , कळीत सुगंध '

( अजून पृ. क्र. ५२ )

' कळीत सुगंध निजणे ' ही गंध प्रतिमा ठरते. त्याचबरोबर 'निशिगंधात गंध' (पृ.क्र. २७) 'निर्माल्य हुंगुं ( ७६ ) यातून गंध प्रतिमा आलेली दिसते. 'कोण , कुठे आहेस तरी !' या कवितेत निशिगंधाचा परिमळ भरला ( पृ. क्र. ७४ ) अशी गंध प्रतिमा काव्यात आलेली दिसते.

अशा कितीतरी गंधप्रतिमा कवी आपल्या कवितेत वापरतात व रानातले सारे गंध रसिक बसल्या जागी भोगतो.

**४. प्राणी प्रतिमा :**

कवी ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहात येणाऱ्या ' प्राणी प्रतिमा ' या रानातील आहे. त्यांच्या कवितेचे विश्रांतीस्थान निसर्ग असल्यामुळे निसर्गातीलच प्राणी प्रतिमा त्याच्या काव्यात प्रामुख्याने आलेल्या आपणास दिसतात.

उदा. ' हुंकारला पारवा
तेजाळला काजवा '

( काळ्या गढीच्या जुन्या .... पृ. क्र. ७९ )

हुंकारला पारवा , तेजाळला काजवा या प्राणी प्रतिमेतून प्रेमाला प्रेयसीकडुन प्रतिसाद मिळाल्याचे कवीला सुचवायचे आहे. 'मी आले लडिवाळ ' या कवितेत कवी म्हणतो -

'' नागिण मी बेभान : चाललें कुठे तरी हे गान ?
उतावीळ हैराण धावते : कुठे केतकीपान ? '' (पृ. क्र. ४०)

' नागीन ' ह्या प्राणी प्रतिमेतून प्रेयसीची उतावीळ, चलबिचल गोंधळलेली अवस्था व्यक्त होते. ' समाधि ' (पृ. क्र. ५१) या कवितेत ' किडे - पाखरे ' या प्रतिमेतून निर्जन भकास प्रदेशाचे चित्रण येताना दिसते. त्याचबरोबर या काव्यसंग्रहात ' हरीणपाडसा रे ऽ', ' ससा ' ' रानहरिणी ' , ' रानीकोकीळ ' बगळ्याची संथ भरारी ' ' मेंढ्या - कोकरू' अशा प्रकारच्या प्राणी प्रतिमा येतात. ' चुकलेले कोकरू' या कवितेत ' पाखरू' , ' कोकरू' या प्राणी प्रतिमांच्या माध्यमातून कवी आपली असहाय्यता केवीलपणा व्यक्त करताना दिसतो.

कवी या कवितेत म्हणतो -

‘ घरट्याखाली पडले इवले बिनपंखी पाखरू :
हुरहुर बघतें कळपामधले चुकलेलें कोकरु ’.

( चुकलेले कोकरूपृ. कृ. ६५ )

येथे कवीची आईविना झालेली दयनिय अवस्था व्यक्त झालेली दिसते. आपली व्याकुळता व्यक्त करण्यासाठी कवीने अचूक प्रतिमा नेमल्याचे दिसते.

## ५. नैसर्गिक-भौतिक प्रतिमा :

निसर्ग व भौतिक गोष्टीचा मेळ या प्रतिमेत असतो. ‘ शीळ ’ काव्यसंग्रहात या प्रतिमाचा कवी वापर करताना दिसतो. उदा. झडीच्या धारा , चांदणी कळा , नितळ चांदणी, फुलाफुलांच्या सरी , गहन अंधार , विस्तीर्ण अंधार , अवखळ बिजली , जीर्ण पाकळ्या , स्वच्छंद चपला ( ९१ ) प्राजक्ताच्या तळी, नाजूक वारा ,मोहक तारे , दवाचे बिंदू , प्राजक्ताच्या तळी, घोर अंधकार कोंदला ,उल्हास वारा , चिन्मय तारा , आंधळ्या राती , चांदण्याचा चूर , भवयाचे इंद्रधनु नाचणे ( ३९ ) इत्यादी

- मोहक तारे- येथे ‘मोहक’ ही भौतिक प्रतिमा व ‘ तारे ’ नैसर्गिक प्रतिमा ठरते. (पृ.क्र. ४७ )
- अवखळ बिजली - येथे अवखळतेमध्ये भौतिकता दडलेली आहे व ‘बिजली’ हे निसर्गाचे रुप आहे . ( पृ. क्र ५९)
- जीर्ण पाकळ्या - ‘जीर्णता’ भौतिक वस्तूचे रुप तर ‘ पाकळ्या ’ नैसर्गिक घटक होय. (पृ. क्र ६९ )
- चांदण्याचा चूर - चांदणे हे निसर्गाचे रुप व चूर होणे मध्ये भौतिकता लपलेली आहे. अशाप्रकारे अनेक उदाहरणाचे स्पष्टीकरण वरीलप्रमाणे देता येईल.

### ६. अमूर्तिकरण प्रतिमा :

'मोहनशीळा' ( २५ ) , 'नजरेचे जुगार' ( २७ ) 'हासले रान' ( २९ ) , 'निजले रान' (२९) 'चंद्राचा नूर' , 'उदासलेले माळरान', 'नाचले हे बन' , 'केसांचा भार', 'स्नेहशून्य जग' (२८), 'पुनवेची शशिकला' (३९) 'सुंदर चाफेकळी' (३९) , 'कोमल वारा' (४७) इत्यादी

उदा. निजले रान - या प्रतिमेत निसर्ग मानवी अनुकरण करताना दिसतो म्हणून ही अमूर्तिकरण प्रतिमा होते.

- 'हसले रान' - येथे रान मनुष्याप्रमाणे हास्य करते. असे दर्शविले गेले आहे. निसर्गाचे मानवी कृतीवर आरोपण येथे झालेले दिसते.
- 'उदासलेले माळरान' - माळरान हे सुध्दा मानवांप्रमाणे दु:खी उदासीन बनू शकते. असे येथे दाखविले आहे.
- 'नाचले हे बन' - वन नाच करीत आहे असे दर्शविले आहे. नृत्य हे येथे मानवाचे अनुकरण आहे. ( पृ.क्र. २६ )

कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत येणारी प्रतिमासृष्टी ही रानाशी नाते सांगणारी आहे. त्याच्या काव्यात येणाऱ्या जवळपास सर्वच प्रतिमा या रानातूनच घेतल्या आहेत. कवी कवितेत नवनवीन प्रतिमा योजतात. रानातून घेतलेला रुप , रंग, नाद, गंध , दृक, नैसर्गिक व भौतिक प्रतिमा कवी अशा चपखल रीतीने वापरतात की, तो शब्द ती प्रतिमा अपरिहार्य होऊन बसते व अशी अपरिहार्य चांगल्या कवितेचे लक्षण असते.

### १२.६ अलंकार :

' भाषेला ज्याच्या - ज्याच्यामुळे शोभा येते त्या गुणधर्मांना ' भाषेचे अलंकार ' असे म्हणतात.'[१५] भाषेच्या अलंकाराचे शब्दालंकार व अर्थालंकार असे दोन प्रकार पडतात. शब्दालंकार मध्ये प्रामुख्याने अनुप्रास , यमक , श्लेष यांचा समावेश होतो. तर अर्थालंकार मध्ये उपमा , रुपक , उत्प्रेक्षा अपन्हुती , व्यतिरेक , अनन्वय , अन्योक्ती , असंगती इत्यादी

अलंकाराचा समावेश होतो. कवी ना.घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहातील कवितांचा अभ्यास करताना आपणाला त्यातील अलंकार समजून घेणे गरजेचे वाटते.

**यमक अलंकार :**

यमकाचे पुष्पयमक व दामयमक असे दोन प्रकार पडतात. कवी ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहात बहुतांश प्रमाणात दामयमक आल्याचे दिसतात. ' चुकलेले कोकरू' या कवितेतील दामयमक पाहण्याजोगे आहे कवी म्हणतो -

' दोष कुणाचा , तूंच पहा , न ऽ कळतच घडल्या चूका :
वाट शोध शोधली : शेवटी थकून बसलों मुका .
ऐल कळेना , पैल दिसेना : बघ , सापडलो इथे
गहन घोर तिमिरांत एकला बन ओसाडी मधे . '

( चुकलेले कोकरु पृ. क्र. ६५ )

वरील कवितेत 'चूका - मुका' , 'इथे - मधे ' त्याचप्रमाणे पुढच्या कडव्यात 'देखले - ऐकले' , 'ना - चेतना' , 'करु - लेकरू' अशाप्रकारे यमक साधून काव्यात लय निर्माण होतो. येथे पहिल्या ओळीचे दुसऱ्या ओळीतील शेवटच्या शब्दाशी यमक साधते. तसेच तिसऱ्या ओळीतील शब्दाचे - चौथ्या ओळीतील शब्दांशी यमक साधताना दिसते. तर ' मनोगत ' या कवितेत यमक साधताना ओळीचा क्रम बदलताना दिसतो कवी म्हणतो -

' शांत निरामय जग असतांना
तरुपर्णांची कुजबुज ऐकत
त्याहुनहि पण हळूच , सजणा ,
सांग तुझें तू मधून मनोगत । '

( मनोगत पृ. क्र. ४७ )

वरील कडव्यात पहिल्या ओळीतील शेवटच्या शब्दाचे तिसऱ्या ओळीतील शब्दाशी त्याचबरोबर दुसऱ्या ओळीतील शेवटच्या शब्दाचे चौथ्या ओळीतील शब्दाशी यमक साधले

दिसते. अशाप्रकारचे वेगळेपणाने यमक जरी कवितेत साधत असले तरी त्यातील गोडवा तसाच टिकून राहताना दिसतो. तर ' तुझ्यामाझ्यांत ग ऽ ' या कवितेतील कडव्यात यमक वेगळ्या पध्दतीने साधलेले दिसते.

' आज आल्यात ग ऽ ।
पावसाच्या सरी
भावनेच्या भरी
तुझ्या माझ्यांत ग ऽ । '

( तुझ्यामाझ्यांत ग ऽ ! पृ. क्र. २७ )

या कवितेतील या कडव्यात पहिली ओळीतील शेवटचे अक्षर व चौथ्या ओळीतील शेवटचे अक्षर यात यमक साधलेले आहे. त्याचबरोबर दुसऱ्या ओळीतील शेवटचे अक्षर व तिसऱ्या ओळीतील शेवटचे अक्षर यात यमक साधले आहे. या कडव्यातील यमक साधण्यात वेगळेपणा दिसतो. कवीने कवितेत मुद्दामहून यमक जुळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही . यमक त्यांच्या कवितेत ओघाओघाने आल्याचे आपणास दिसतील. काव्यात योग्य यमक साधल्याने काव्य लयबध्द, गेय होऊन गीत बनते. कवितेतील आशय अधिकाधिक संपन्न होण्यासाठी यमकाचा उपयोग झाल्याचे दिसते.

' नील जलानों ! ' या कवितेतील यमक इतर कवितेपेक्षा वेगळेपण दर्शविते.

' ओसाड दऱ्यांतून वहा , नील जलांनो ।
रानांतच हासून फुला , रानफुलांनो ।
प्राशुनी पुराणी मदिरा धुंद रुपेरी
अज्ञात विदेशांत फिरा, चंद्रकलानो । ' (पृ. क्र. ८७)

या कवितेत पहिल्या , दुसऱ्या त्याचबरोबर चौथ्या ओळीतील शेवटच्या किंवा अंत्य अक्षरात यमक साधलेले आहे. तिसऱ्या ओळीतील अत्यंपदात यमक साधलेले नाही. मात्र या व्यतिरिक्त तिन्हीही ओळीत यमक अचूक साधत असल्याने तिसऱ्या ओळीत अत्यंपदात

यमक साधत नसले तरी लयबध्दता निर्माण होण्यास अडथळा प्राप्त होत नाही. असे येथे दिसते.

**अर्थालंकार :**

**उपमा अलंकार :**

उपमा अलंकारात प्रामुख्याने एक वस्तू दुसऱ्या वस्तू सारखी आहे. असे वर्णन यात आलेले असते. ना. घ. देशपांडे यांच्या ' शीळ ' काव्यसंग्रहात काही कवितेत उपमा अलंकाराचा वापर झाल्याचे दिसते. त्याबाबत पुढीलप्रमाणे विचार करता येईल. 'सुगी ' या कवितेत 'सरु' हे उपमेय व 'वासरू' उपमान असून दोघांतील सारखेपणा सुंदर रीतीने वर्णन केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे -

' सासरी सरु, गोठ्यांत जसं ऽ वासरु :

येईलच मायघराला घरटयांत जसं ऽ पाखरु . ' ( सुगी पृ.क्र. ३१ )

येथे दोघात साम्य दिसून येते, त्यामुळे येथे उपमा अलंकार होतो. त्याचबरोबर ' पावसाळा ' या कवितेत प्रेयसीचा गौर रंग व केळीचे पान यांच्यात साम्य साधण्याचा प्रयत्न केला आहे. येथे ' गौर रंग ' उपमेय तर ' केळपान ' हे उपमान म्हणून येते. या उपमेने कवितेला बहर आल्याचे दिसते.

' शीळ ' या गाजलेल्या पहिल्याच कवितेत ' राया ' हे उपमेय तर ' फुल ' हे उपमान बनून येते व दोघात साम्य दर्शविण्याचे काम पूर्ण होते. कवी या कवितेत म्हणतो -

' रानिं राया जसा फुलावाणी

रानिं फुलेन मी फुलराणी :

बाइ, सुवास रानिं भरतील। ' ( शीळ पृ. क्र. २५ )

रायाला किंवा प्रियकराला प्रेयसी फुलाची उपमा देताना येथे दिसते. फुलाचा नाजुकपणा आपल्या रायात असल्याचे प्रेयसीला येथे सुचवायचे आहे. असे दिसते.

**उत्प्रेक्षा अलंकार :**

''उपमेय हे जणू उपमानच आहे असे जेथे वर्णिलेले असते तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो.''[१६] उत्प्रेक्षा अलंकारात प्रामुख्याने ' जणू ' , जणू काय , गमे , वाटे , भासे की ' यासारखे साम्यवाचक शब्द येतात. ' शीळ ' काव्यसंग्रहातील कवितेत आलेले ' उत्प्रेक्षा अलंकार ' पुढीलप्रमाणे सांगता येतील. ' देवधर्म ' या कवितेत आपली प्रीत व्यक्त करतांना प्रेयसी म्हणते -

' हळूहळू हळूवार सख्या , तूं प्रेमबोल लागला म्हणू
सारंगीचे सूर जणूं ! ' ( देवधर्म पृ. क्र. ८५ )

' देवधर्म ' या कवितेतील प्रेयसीला आपल्या प्रियकराचे प्रेम बोल जणू सारंगीचे सूर भासू लागतात. सारंगीचे सूर व सख्याचे प्रेमबोल यात कवीने साम्य साधले आहे. त्याचबरोबर याही पुढे जाऊन सख्याचे प्रेमबोल सारंगीचेच सूर आहेत. असे स्पष्ट केले आहे. म्हणून येथे उत्प्रेक्षा अलंकार होतो.

' अर्पण ' या कवितेत आपला जन्म हा घात अपघातासाठीच झाला हे सांगताना कवी म्हणतो -

' चहूंकडे आघात , घात , अपघातच झाले मला : °
जन्मलों त्यांच्याकरीता जणू । ' ( अर्पण पृ. क्र. ७६ )

कवी म्हणतो की , घात , अपघात आपल्या आयुष्यातील एक भाग आहे. असे नसून आपला जन्मच मुळी घात , आघात व अपघातासाठी झाला आहे. येथे घात, अपघात हे उपमेय असून ' जन्म ' हा उपमान आहे.

उत्प्रेक्षा अलंकारात 'उपमेय' हे उपमानच होते. त्यामुळे या कवितेत आयुष्यातील घात , आघात व अपघात हेच आपले जीवन आहे व आपला जन्म ते सोसण्यासाठीच झाला आहे. असे कवी म्हणतो. येथे या ओळीत उत्प्रेक्षा अलंकार दिसून येतो.

**१२.७ रूपकात्मकता :**

ना. घ. देशपांडे यांनी आपल्या ' शीळ ' या काव्यसंग्रहात विविध प्रकारची रुपे योजिली आहेत. त्यामुळे या काव्यसंग्रहातील कविता उठून दिसतात. त्यातील भाव अधिक गर्द बनल्याचे दिसते. त्यांनी काव्यसंग्रहात वापरलेल्या रुपकाचा खालीलप्रमाणे विचार करता येईल.

कवी ना. घ. देशपांडे आपल्या कवितेत पौराणिक देवदेवतांच्या नावाचे उल्लेख करतात. त्याच्या नावामुळे कवितेला वेगळा उठाव मिळाल्याचे दिसते. उदा. ' शीळ ' या कवितेत कवी म्हणतो -

' जसा काही ग मोहन कान्हा !

हासे , जसा ग राम घननीळ ! ( शीळ, पृ. क्र. २५ )

येथे आपला प्रियकर हा मोहन ( कृष्णा ) प्रमाणे दिसतो व त्याचे हास्य प्रभू रामचंद्राच्या हास्याप्रमाणे आहे. असे कवी रुपकाच्या आधारे स्पष्ट करतो. देवदेवतांच्या नावाच्या वापरामुळे त्या कवितेतील ओळीच्या अर्थाला विशेषत्व प्राप्त होते. ' प्रेमपीठ ' या कवितेत प्रेयसीला ' कलावती ' , ' कमला ' व स्वत:ला 'सांब शंकर ' संबोधतो. कवी आपल्या कवितेत प्रेयसीसाठी विविध रुपके योजतांना दिसतात. त्यांनी प्रेयसीसाठी वापरलेले रुपके अचूक वाटतात. कवी कवितेत प्रेयसीसाठी 'चंचला' ( वीज), चांदणी , राजसे, देवी , मालन , हरिण , कोकिळा , पोर , पूनवेची शशिकला , वीणेची तार , नागीण अशाप्रकारची रुपके योजतात ' उन्मनी ' या कवितेत कवी म्हणतो -

' बाहेर गहन अंधार फार दाटला

पण घरात ही पुनवेची शशिकला तूं हासली ' ( उन्मनी, पृ. ३२ )

येथे प्रेयसीसाठी कवीने ' पुनवेची शशिकला ' हे रुपक योजल्याचे दिसते.

त्याचबरोबर स्त्री साठी 'किशोरी' , ' संगिनी ' , चारूता ' , ' सुंदरा ' , ' हरिणपाडसा' ' भोळी माळीण ' ' कुलवंता , ' ' देवांगणा ' , ' ललीते ', ' चंद्रीका', 'निर्व्दंद विमला'

अशी रुपके योजलेली दिसतात. ‘ स्त्रीया या अनेकवचनी शब्दासाठी ‘ चांदण्या’ हे रुपक कवी वापरतात. पत्नीसाठी प्रामुख्याने ‘ चारुता ’ , पुनवेची शशिकला ’ चाफेकळी , ‘रानराणी’, ‘ प्रेमोज्ज्वला ’ अशी रुपके वापरतात. कवी ना.घ. देशपांडे यांनी आपल्या काव्यात भरभरुन रुपकांचा वापर केल्याचे दिसतो. कवी हास्यासाठी ‘ फुलासारखे हसणे ’ ‘आसंमत खेडे ’ अशी अचूक रुपके वापरतात असे दिसते. त्याचबरोबर स्त्री देहासाठी कवी विशेष रुपके योजतो. तिचा नूर चंद्रासारखा असणे, तिचा सुर मैनेच्या सुराप्रमाणे भासणे , तिचे चंद्रासारखे मुख, तिचा उंचबांधा यातून स्त्री देहाचे विशेष वर्णन केल्याचे दिसते. ‘पावसाळा ’ या कवितेत कवी म्हणतो -

‘ हालते आहे कळीची पाकळी अन् पाकळी ,

चुंबनाधीरा घरी ही नाचरी ओष्ठावली.’ (पावसाळा, पृ. क्र. ६२)

‘ नाचरी ओष्ठावली ’ या रुपकातून प्रेयसीचा अधीर देहभाव व्यक्त होताना दिसतो. याचबरोबर कवी ‘ दुःखाने अश्रु ओघळणे ’ याला पावसाळी लोचने, चित्त स्थिर नसल्याला ‘ चित्त रानकाळी ’ संबोधतो तिचा श्वास रानवाऱ्याप्रमाणे भासणे अशी स्त्री देहासाठी कवी रुपके योजतो.

त्याचबरोबर कवी ना.घ. देशपांडे आपल्या कवितेत प्रियकर या शब्दाऐवजी ‘अमीर’, ‘ रावा ’ , ‘ सखा ’, ‘ नंदना ’ , ‘राघू ’ , ‘ सजणा ’ ‘धनी ’ ‘ वाटसरु ’ , ‘ सुकाणू ’ अशी रुपके योजतात. ‘ ये शेवटी तरी तूं ’ या कवितेत प्रेयसी प्रियकराला वेडा अमीर म्हणताना दिसते.

‘ हे भागलेत डोळे, नाही उसंत जीवा :

वेडा अमीर माझा , बाई कुठे बघावा। ’ ( पृ. क्र. ३२ )

येथे ‘ अमीर ’ हे रुपक कवी योजतात. ‘ कंचनी ’ या कवितेत प्रियकराला ‘ साजणा ’ व प्रेयसीला ‘ कंचनी ’ संबोधल्याचे दिसते. कवी या कवितेत म्हणतो -

' झाले एक मी साजणी : कुठे माझा ग ऽ साजण ?

झालें एक मी कंचनी : करुं कोणाचे रंजन ?.' ( कंचनी, पृ. क्र. २६)

त्याचबरोबर कवी प्रियकर - प्रेयसी यांच्या मनातील निराशा व्यक्त करण्यासाठी ' काळी रात ', ' अवकाश काळे ' , ' निरर्थ पसारा ' ' उदासीन वारा ' ' शिणले हृदयशरीर ' ' झडली पाने ' गलित पर्ण ', 'दुभंगली साखळी', 'अश्रुबिंदू गोठले' अशी रूपके योजतात. या रूपकातून आशय अधिक गहन होऊन त्याचा सखोल प्रभाव पडल्याचे दिसते. 'कधी व्हायचे मीलन ? ' या कवितेत कवी म्हणतो -

' आसमंत हासे खेळे : भासे निरर्थ पसारा

जीव झाला वारावारा . ' ( पृ. क्र. ४२ )

निरर्थ पसारा या रूपकातून कवी मनातील उदासिनता प्रकर्षाने व्यक्त होताना दिसते. त्याचप्रमाणे ' माझी गाणी ' या कवितेत कवी आपले दु:ख व्यक्त करताना म्हणतो -

' उसासे मी किती टाकूं ? किती होऊ तरी कष्टी ?

अघोरी ,उष्ण अश्रूंचा निघाला पावसाळी पूर. ' ( माझी गाणी, पृ.क्र. ८१ )

' पावसाळी पूर ' या रूपकातून दु:खाचा ओंसाडलेला आवेगच व्यक्त होतो. याबरोबर कवी मनाला 'खुळे मन', प्रीतीला - 'साजूक फुल ' अशी रुपके योजतो. आई नसलेल्या मुलाला ' कोकरू' 'बिनपंखी पाखरू' अशी रुपके वापरुन आशयाला एक वेगळेच परिमाण प्राप्त करुन देतो असे दिसते.

कवितेची अभिव्यक्ती ज्या आकृतीबंधातून प्रकट होते त्या आकृतीबंधासह तिची काही वैशिष्टये यांचा विचार इथे केल्यानंतर एक गोष्ट ध्यानी येते ती ही की, त्यांची कविता आशयाइतकीच अभिव्यक्तीच्या दृष्टिनेही समर्थ आहे. शीर्षकाची अन्वर्थकता , त्यातील विशेषत: काव्यशैली, गेयता , प्रतिकात्मकता , रुपकात्मकता , इत्यादीचा विचार केल्यानंतर हा कवी आशयाला आकृतीबंधातून अतिशय समर्पकपणे अभिव्यक्त करतो. प्रकट करतो हे जाणवते.

## १३. समारोप :

अशाप्रकारे ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' काव्यसंग्रहातील कविता त्यातील प्रेमभावना व तिला असलेला गेयतेचा गोडवा यांनी अत्यंत गाजल्या. त्याचबरोबर कवीने आपल्या काव्यात निसर्ग चित्रित केला. त्यांची कविता रानावनात फुलली असली तरी समाजातील वास्तवाचे भान ठेवणारी आहे. जानपद गीते, कौटुंबिक कविता, गझल, आध्यात्मिक कविता, गूढगुंजनपर कविता, जीवनविषयक कविता या सर्व विषयांना स्पर्श केलेला दिसून येतो. वैदर्भीय बोलीतील शद्बांनी कवितेला उठाव आल्याचे दिसते. शीळ मधील कवितेत उपमा, प्रतिमा, रूपके आल्याने काव्य अधिक प्रभावी बनले आहे. या सर्व बाबींमुळे 'शीळ' हा काव्यसंग्रह उत्कृष्ट झाल्याचे दिसते.

# संदर्भग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | राजाध्यक्ष मं. वि. | प्रस्तावना<br>' शीळ'काव्यसंग्रह , ना. घ. देशपांडे<br>मौज प्रकाशन मुंबई , प्र. आ. १९५४<br>पृ.क्र. ७ |
| २. | रा. श. वांळिबे | 'गडकऱ्यांचे अंतरंग'<br>चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९५१<br>पृ. क्र. २८३ |
| ३. | कुलकर्णी भीमराव | प्रस्तावना , ' चिरयौवन ' काव्यसंग्रह<br>आ. रा. देशपांडे<br>सुविचार प्रकाशन मंडळ , पूणे १९७१<br>पृ.क्र. १० |
| ४. | गणोरकर प्रभा | 'ललित' मासिक<br>संपा . अशोक कोठावळे , मुंबई ४००००४<br>जून, २०००. पृ.क्र. १५ |
| ५. | क्षिरसागर श्री. के. | 'साहित्याच्या दरबारात'<br>सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, प्र. आ. १९६१<br>पृ.क्र. १०७ |
| ६. | राजाध्यक्ष मं. वि. | लेख - 'शीळ'<br>'अम्लान'<br>चेतश्री प्रकाशन, अमळनेर<br>पृ. क्र. २२ व २३ |

७. पंडीत भ. श्री. — प्रस्तावना
‘ शीळ ’ काव्यसंग्रह ,
ना. घ. देशपांडे
मौज प्रकाशन , मुंबई प्र. आ. १९५४
पृ. क्र. १८

८. तत्रैव — पृ. क्र. १५

९. देशपांडे ना. घ — प्रस्तावना
‘ खूणगाठी ’ काव्यसंग्रह
मौज प्रकाशन , मुंबई प्र. आ. १९८५
पृ. क्र. ३०

१०. कोत्तापल्ले नागनाथ — ‘मर्ढेकरपूर्व मराठी कविता’ (लेख)
मराठी कविता आकलन आणि आस्वाद
स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००१
पृ. क्र. ९१

११. इनामदार कल्याण — ‘मराठी गीतरचना १९४० ते १९८० स्वरुप आणि विकास’, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००६
पृ. क्र. १५३

१२. रसाळ सुधीर — कविता आणि प्रतिमा
मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. ऑक्टों. २००२
पृ. क्र. ४४५

१३. बोरकर बा. भ. — ‘मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन’
संपा. प्रा. निशिकांत ठकार,
महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७७
पृ.क्र. ३१९

| | | |
|---|---|---|
| १४. | राजाध्यक्ष मं. वि | प्रस्तावना<br>‘ शीळ’ काव्यसंग्रह<br>मौज प्रकाशन मुंबई, प्र.आ. १९५४<br>पृ. क्र. २२ |
| १५. | वाळंबे मो. रा. | सुगम मराठी व्याकरण लेखन<br>नितीन प्रकाशन ,पुणे ३०<br>नवीन सुधारित आवृत्ती जुन २००७.<br>पृ. क्र. १७० |